www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar


तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी




मुख्य संपादक - भारती आमले उपसंपादक - श्री विलास गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश पाटील सह संपादक - श्री मुकुंद कांबळे महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 अंक : ४० शनिवार दि. १८ ऑक्टोबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# ऐन दिवाळीत फटाक्यांचा तुटवडा

## दरात तब्बल २० टक्क्यांनी वाढ; ग्राहकांच्या खिशाला कात्री

**दैनिक युवक आधार**

मुंबई : दिवाळीचा सण अगदीच एक-दोन दिवसांवर आला असताना यंदा देशभरातील बाजारात फटाक्यांचा तुटवडा निर्माण झाला आहे. परिणामी फटाक्यांच्या किमती तब्बल २० टक्क्यांनी वाढल्या आहेत. यामुळे फटाके फोडून दिवाळी साजरी करणाऱ्यांच्या खिशाला कात्री लागत आहे.



दिवाळीच्या पार्श्वभूमीवर फटाक्यांच्या होलसेल बाजारात किरकोळ खरेदीदारांची खरेदीसाठी लगबग सुरू आहे. लहान-मोठे फटाके खरेदीसाठी बाजारात उपलब्ध झाले आहेत. मात्र दरवर्षीच्या तुलनेत यंदा फटाक्यांचे उत्पादन कमी झाल्याने याचा फटाक्यांच्या उपलब्धतेवर परिणाम झाला आहे.दिवाळीच्या पाच ते सहा महिने अगोदर फटाके निर्मितीस प्रारंभ होतो. यंदा फटाके निर्मितीचे केंद्र असलेल्या तमिळनाडूमधील शिव काशी येथे अतिवृष्टी झाली. त्यामुळे फटाके निर्मितीमध्ये अडचणी आल्या. फटाके सुकण्यासाठी ऊन गरजेचे असते. मात्र यंदा तेथे पावसामुळे फटाके सुकवण्यात अडचण निर्माण झाली. यामुळे तेथील कारखानदारांनी उत्पादन बंद ठेवले होते. परिणामी देशात फटाक्यांची टंचाई निर्माण झाली असल्याचे, होलसेल विक्रेते राहुल घोणे यांनी सांगितले.

कच्चे साहित्य महाग झाल्यानेही फटाक्यांच्या किमतीमध्ये सुमारे २० टक्के वाढ झाली आहे. यातच फटाक्यांची वात तयार करणाऱ्या नागपूर येथील कंपनीला आग लागली होती. त्याचा फटाक्यांच्या उत्पादनावर मोठा परिणाम झाला.

यातच वातेची किंमत १० टक्क्यांनी वाढल्याचा परिणाम म्हणून फटाक्यांच्या किमतीमध्ये वाढ झाली आहे.

माल कमी आल्याने फटाक्यांच्या किमतीवरही याचा परिणाम झाल्याचे घोणे म्हणाले.

### 'पॉप पॉप' फटाक्याला मागणी

दरवर्षी फटाके बाजारात रंगीबेरंगी, विविध आवाज करणारे फटाके येतात. लहान मुलांना आकर्षक ठरणारे फटाके यंदाही बाजारात उपलब्ध आहेत. यामध्ये लहान मुलांच्या आवडीच्या 'पॉप पॉप' फटाक्याला अधिक मागणी आहे. या फटाक्याच्या किमतीमध्येही वाढ झाली असल्याचेही घोणे यांनी सांगितले.

रयत शिक्षण संस्थेचे सचिव विकास देशमुख यांची

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर सीबीएससी स्कूलला सदिच्छा भेट

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवा नोडमधील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर सीबीएससी स्कूलला रयत शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. विकासज देशमुख यांनी सदिच्छा भेट दिली.



यावेळी त्यांनी संपूर्ण स्कूलची पाहणी केली व स्कूलच्या कामाचा, प्रगतीचा व मराठी माध्यम विभागाचा आढावा घेतला तसेच स्कूलच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौंसिलचे ज्येष्ठ सदस्य व थोर देणगीदार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे स्वागत सत्कार केले. यावेळी स्कूलच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर, सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालय मराठी माध्यमचे मुख्याध्यापक दीपक भरणुके, रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागाचे पीआरओ बाळासाहेब कारंडे, भाजपचे उलवे नोड अध्यक्ष निलेश खारकर, धीरज ओवळेकर, शिवाजी अहिरकर, हर्षल फडके आदी उपस्थित होते

# परतूर नगर पालिका निवडणूक वंचित बहुजन आघाडी स्वबळावर लढणार



**दैनिक युवक आधार**
**परतूर -जालना(अशोक ठोके)**

परतूर नगरपालिका निवडणुका डोळयासमोर ठेवून वंचित बहुजन आघाडी शहर कार्यकारिणीची बैठक वंचित बहुजन आघाडीचे शहर अध्यक्ष राहुल नाटकर यांच्या अध्यक्षतेखाली "विश्र्वशांती बुद्ध विहार", नागसेन नगर, परतूर येथे पार पडली. भगवान गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून बैठकीची सुरुवात करण्यात आली. हि बैठक जालना पूर्व चे उपाध्यक्ष रोहनजी वाघमारे , परतूर तालुका अध्यक्ष रविंद्र भदर्गे , रामप्रसाद थोरात, गौतम खंडागळे, गुलाब दवंडे , कैलास पहाडे, बौद्धाचार्य हेमंत पहाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीच्या नगराध्यक्ष पदासाठी राहुल नाटकर तर प्रभाग क्रमांक 11 च्या नगरसेवक पदासाठी स्वप्नील पहाडे निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याचे बैठकीमध्ये म्हटले आहे तसेच उर्वरित सर्वच्या सर्व जागांसाठी उमेदवारांची चाचपणी सुरू आहे.या बैठकीमध्ये येणाऱ्या नगरपालिका निवडणुकीला सामोरे कसे जायचे याची रणनीती ठरवण्यात आली. या निवडणुकी मध्ये वंचित बहुजन आघाडी सर्वच्या सर्व जागा स्वबळावर लढणार असल्याचे म्हटले आहे. या वेळी प्रदीप साळवे,दिपक हिवाळे, रवि घोडे, तुषार पहाडे, संतोष घोडे, पंकज इंगळे, केतन खंदारे, महेश वाळवंटे, राहुल पहाडे, मनोज वंजारे, दिलीप साळवे,उत्तम सोनपसारे व कार्यकर्ते मोठ्या संखेने उपस्थित होते.

# सेलू ते कोल्हा पाटी रस्त्याचे काम सुरू — धुळीमुळे नागरिक त्रस्त



**दैनिक युवक आधार**
**सेलू (प्रतिनिधी) शिवाजी पवार**

सेलू ते कोल्हा पाटी या रस्त्याचे काम सध्या सुरू असून, या कामाचे व्यवस्थापन योग्य पद्धतीने न झाल्याने रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धुळ उडत आहे. या धुळीमुळे परिसरातील नागरिक, वाहनचालक आणि पादचारी त्रस्त झाले आहेत.

रस्त्याच्या दुतर्फा उडणाऱ्या धुळीमुळे श्वसनाचे त्रास, डोळ्यांची जळजळ अशा आरोग्यविषयक समस्या निर्माण होत आहेत. लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना या धुळीचा सर्वाधिक त्रास होत असल्याचे दिसून येत आहे.

स्थानिक नागरिकांनी संबंधित ठेकेदार व सार्वजनिक बांधकाम विभागाचे लक्ष या समस्येकडे वेधले असून, काम सुरू असताना नियमित पाणी फवारणी करून धुळीवर नियंत्रण ठेवण्याची मागणी केली आहे.

नागरिकांच्या मते, रस्ता चांगला होणे गरजेचे आहेच, पण कामाच्या दरम्यान नागरिकांच्या आरोग्याचा व सुरक्षिततेचा विचार करणे तितकेच आवश्यक आहे.



## दिवाळी संपेपर्यंत धारावीत नियमित दोन वेळा स्वछता करावी ज्येष्ठ नागरिकांची मागणी!

**दैनिक युवक आधार**
**मुबंई (दत्ता खंदारे/धारावी )**

सन्मा.अतिरिक्त आयुक्त शहर विभाग यांनी दिवाळी निमित्ताने मुंबईतील रस्ते, पायवाटा,गल्ली बोळ, सार्वजनिक उद्यान, फुटपात व अंतर्गत रस्ते दिवाळीपर्यंत स्वच्छ करण्याच्या सूचना व आदेश नुकतेच महानगरपालिका कामगार कर्मचारी अधिकारी यांना दिले.हे सर्व वृत्तपत्रातून वाचण्यात आले.त्यानुसार फेस कॉम संलग्न हॅपिनेस ज्येष्ठ नागरिक संघ धारावी आणि झेंडा ग्रुप यांच्यावतीने ज्येष्ठांच्या सह्यांचे एक निवेदन माननीय सहाय्यक आयुक्त मुख्य पर्यवेक्षक घनकचरा जी उत्तर यांना तसेच माननीय उपायुक्त परिमंडळ 2 परेल कार्यालय यानाही लेखी निवेदनाद्वारे धारावीतील संत कक्कया मार्ग,एमपी नगर ढोरवाडा अंतर्गत रस्ते एन शिवराजन उद्यान तसेच खुली मैदाने गल्ली बोळ रस्त्यावरील खाचखळगे तसेच जागोजागी पडलेली रॅबिट, धूळ माती कचरा पेट्या परिसर दिवाळी संपेपर्यंत नियमित दिवसातून दोन वेळा स्वच्छता करून नागरिकांना दिलासा द्यावा.स्वच्छ धारावी, सुंदर धारावी, स्वास्थ धारावी अशी मागणी जेष्ठांच्या स्वाक्षरीने महानगरपालिका संबंधित खाते प्रमुख विभाग अधिकारी यांच्याकडे दि.१५ ऑक्टोबर २०२५ रोजी निवेदन सादर केले आहे. माननीय अतिरिक्त आयुक्त मुंबई शहर यांनी केलेला सूचना व आदेशांचे पालन करून स्वच्छता कामाला प्राधान्य द्यावे अशी विनंती करण्यात आली आहे.

# नवज्योती विद्यामंदिर हायस्कूल बांधकामास महापालिकेचा अडथळा कशासाठी?

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (प्रतिनिधी )**

शारदा एज्युकेशन चॅरिटेबल ट्रस्टतर्फे भाडे तत्वावर चालविण्यात येणारी नवज्योती विद्यामंदिर हायस्कूल,अली तलाव लेन, खारोडी, मालाड (प.), ही महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त अनुदानित शाळा असून १९९३ पासून येथे इयत्ता १०वी पर्यंतचे शिक्षण नियमितपणे सुरू आहे.

सदर शाळेच्या इमारतीतील काही वर्गखोल्यांच्या भिंतींवरील प्लास्टर सैल झाले असून, पावसाळ्यात पाणी गळती होत आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययन-अध्यापन कार्यात अडथळा निर्माण होत आहे.



शारदा एज्युकेशन चॅरिटेबल ट्रस्टतर्फे सहाय्यक अभियंता,इमारत व कारखाने खाते,पी-नॉर्थ विभाग कार्यालय,मालाड (प.), मुंबई - ४०० ०६४ यांनाविद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी संस्थेच्या वतीने स्वखर्चाने भिंतींचे प्लास्टर दुरुस्ती, वीज व्यवस्थासुधारणा तसेच पाणी गळती थांबविण्याची कामे करण्याची परवानगी मागत असून सुद्धा त्यासाठी असून यासाठी आवश्यक परवानगी अभियंता,इमारत व कारखाने खाते,पी-नॉर्थ विभागा कडून शारदा एज्युकेशन चॅरिटेबल ट्रस्टला दिली जात नाही.सदर शाळेचे बांधकाम स्वतः शारदा एज्युकेशन चॅरिटेबल ट्रस्टतर्फे करण्यात येणार असून महापालिका त्याला का विरोध करीत आहे याचे उत्तर दिले जात नाही.

शाळेची इमारत कोसळून मोठा अपघात होण्याची शक्यता असून भविष्यात मोठा अपघात होऊ शकतो याला सर्वस्वी अभियंता,इमारत व कारखाने खाते,पी-नॉर्थ विभाग जबाबदार राहील. असे शारदा एज्युकेशन चॅरिटेबल ट्रस्टतर्फे दिलेले पत्रकात म्हटले आहे.

# दिवाळीतून समरसता... !!

**मी अविवेकाची काजळी । फेडूनि विवेकदीप उजळी। ते योगिया पाहे दिवाळी । निरंतर ।।**

विवेकदीपास आलेली अविवकेरुप काजळी झाडून तो विचाररुप दिवा प्रज्वलित करतो. त्यावेळी योगी लोकांना निरंतर आनंदमय, तेजोमय अशा दिवाळीचा सुवर्ण दिवस उगवतो.

भारत हा विविधतेने नटलेला, समृद्ध असा सांस्कृतिक वारसा असलेला महान देश आहे. आपल्या देशात अनेक धर्म, पंथ, जाती, परंपरा, प्रांत, भाषा, पोशाख, अन्नसंस्कृती आदी सर्वांमध्ये अपार वैविध्य आहे. भारतात होळी, महाशिवरात्री, गणेशोत्सव, रामनवमी, नवरात्री, ईद, नाताळ, ओणम, बैसाखी असे अनेक सण आणि राष्ट्रीय उत्सव मोठया आनंदाने साजरे करतो. आपल्याकडील दहीहंडी, नवरात्रीचा गरबा, गणेशोत्सव या सणांमध्ये मोठ्या प्रमाणात लोकसमूह सहभागी करून घेणारी उत्सव परंपरा आहे. रामनवमी, हनुमान जयंती, महाशिवरात्री, नाताळ या धार्मिक सणांमधून भक्तिभाव आणि समान श्रद्धा निर्माण होते. मकरसंक्रांती सणाला "तिळगुळ घ्या गोड गोड बोला" असे गोड बोल समरसता व सौहार्दता यांचा संदेश देतो. प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन अशा राष्ट्रीय उत्सवांतून धर्मनिरपेक्ष समरसतेचे दर्शन घडते. म्हणूनच, सण-उत्सव हे समाजातील क्षमाशीलतेचे व प्रेमाचे प्रतीक समजले जातात. आपण सर्व धर्म, पंथ, प्रांत, जात, भाषा, लिंग या सर्वांमध्ये भेदभाव न ठेवता एकता, समता व बंधुभावाच्या नात्याने जगतो. एकमेकांचा आदर करत विविध सण, उत्सव, परंपरा, कार्यक्रम अतिशय उत्साहाने साजरे करत असतो, याचे महत्त्वाचे कारण म्हणजे आपल्यातील समरसता ! आपल्या सर्वांमध्ये एकता, समता व बंधुतेच्या उदात्त भावनेने एकत्र बांधून ठेवणारा सुंदर धागा म्हणजे 'समरसता' आहे. "समरसता" हा शब्द "सम" (समान) व "रस" (भाव) या दोन शब्दांपासून तयार झाला आहे. मनात कोणत्याही प्रकारचा भेदभाव न ठेवता सर्वांना समान भावाने पाहून एकात्मतेचा अनुभव देण्याची अवस्था म्हणजे 'समरसता' होय. ती एक मानवी आंतरिक शक्ती आहे. 'समरसता' ही सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक, राष्ट्रीय, आध्यात्मिक अशा विविध प्रकारची असते.

संतांनी या समरसतेचा पाया घातला. संत साहित्यात "समरसता" या भावनेला अत्यंत महत्वाचे स्थान होते. संतांनी समाजातील भेदभाव, अन्याय आणि अहंकार दूर करून "सर्व जीवात एकच परमात्मा" आहे, हीच समरसतेची शिकवण दिली. संत ज्ञानेश्वरांनी आपल्या ओव्यांतून समरसतेचा विचार अत्यंत गूढ व व्यापकपणे मांडला. "जीवो जीवासी न विरे, सर्वत्र तोचि ईश्वर ठरे। जेथ भेद बुद्धि नसे, तेथ समरसता असे।।" ही ओवी संत ज्ञानेश्वरांच्या अद्वैत वेदांताच्या तत्त्वज्ञानावर आधारित आहे. 'प्रत्येक जीव हा एकमेकांपेक्षा वेगळा नसतो, तर तो एकच ईश्वराचा अविभाज्य भाग आहे. जिथे 'भेद' किंवा 'फरक' करण्याची बुद्धी नसते, तिथे 'समरसता' म्हणजेच समानता आणि एकरूपता असते.' संत तुकाराम महाराज सांगतात, "विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म, भेदाभेद भ्रम अमंगळ।।" 'वैष्णवांचा धर्म म्हणजे सर्वत्र विष्णू पाहणे असा असल्याने भेदाभेदाचा विचार करणे अमंगळ आहे. तुकोबांच्या अभंगांमध्ये अशा खऱ्या समरसतेचा विचार अत्यंत ठामपणे दिसून येतो. संत एकनाथांनी भेदभाव सोडून सर्व माणसांमध्ये देव पाहिला. त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध भूमिका घेऊन प्रत्यक्ष कृतीतून समानतेचा संदेश दिला. संतांनी हा संदेश पुढे नेऊन समाजात भेदभावविरहित, प्रेमभावयुक्त जीवनमूल्ये रुजवली.

दिवाळीतून समरसतेचा विचार करता, ही समरसता आपल्याला दिवाळी सणाच्या कालावधीत प्रत्येक दिवशी प्रकर्षाने जाणवते. क्षणोक्षणी त्याची प्रचिती येत असते. वसुबारस, धनत्रयोदशी, लक्ष्मीपूजन, नरक चतुर्दशी, बलिप्रतिपदा, भाऊबीज अशा विविध परंपरा, चालीरीती आणि विधींचे पालन करून सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक व आध्यात्मिक समरसता निर्माण केली जाते. दीपोत्सव - दिव्यांची रोषणाई, रांगोळी, आतिषबाजी, सजावट यातून नवचैतन्याचा आविष्कार पाहावयास मिळतो. दिवाळीत आपण आपापल्या घराची व परिसराची स्वच्छता, साफसफाई आणि सुंदर सुंदर सजावट करत असतो. ज्यामुळे घर-दाराचे नूतनीकरण होऊन सर्वत्र एक प्रकारचे नवचैतन्य निर्माण होते. दिवाळी हा सण आपल्यातील अज्ञान दूर करून ज्ञानाचा प्रकाश पसरवण्याचे प्रतीक आहे. नकारात्मकता काढून आत्मा शुद्ध करणारी सकारात्मकता वाढवण्याची संधी देणारा सण आहे. दिवाळी हा वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक आहे. पावसाळ्यानंतर येणाऱ्या समृद्धीचा उत्सव म्हणजे दिवाळी सण असतो. या काळात लोक निसर्गातील सर्व घटकांप्रती आणि एकमेकांप्रती कृतज्ञता व आदर व्यक्त करतात, ज्यामुळे समाजात सकारात्मक वातावरण निर्माण होते. मनाला नव उभारी मिळते. 'शेतकरी' हा जगाचा पोशिंदा आहे. दिवाळी काळात धान्य तयार होऊन ते शेतकऱ्याच्या घरी आल्याने शेतकऱ्याचा आनंद गगनात मावेनासा होतो. त्यामुळे हा सण ग्रामीण भागात सर्वत्र कृषीविषयक आनंदाचा उत्सव म्हणून मोठ्या आनंदाने साजरा केला जातो. दिवाळीत पंचमहाभूते आणि लक्ष्मी व विष्णू अशा इतर देवी-देवतांचे, निसर्गातील विविध घटकांचे पूजन केले जाते, गोवर्धन पूजा केली जाते. असे करून निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करून आध्यात्मिक, सामाजिक व सांस्कृतिक समरसता वृद्धिंगत होते.

तमसो मा ज्योतिर्गमय... म्हणजे, अंधाराकडून प्रकाशाकडे वाटचाल करणे. दिवाळी हा सण आपल्याला अंधारातून उजेडाकडे, अज्ञानातून ज्ञानाकडे नेतो. वाईटावर चांगल्याचा विजय दर्शवतो, ज्यामुळे समरसतेची भावना वाढते. अज्ञानरूपी अंधःकाराचा नायनाट करून ज्ञानरूपी प्रकाशाचा दिवा सदैव आपल्या मनात तेवत ठेवण्याचा संदेश दिवाळी सणातून मिळतो. ज्यामुळे लोकांच्या मनात सकारात्मकतेच्या भावनेबरोबर जीवन जगण्याची एक नवी आशा पल्लवित होते. विविध धर्मांचे लोक एकत्र येऊन दिवाळी सण साजरा करण्यातून एकमेकांमध्ये आपुलकी, प्रेम, आदर आदी गोष्टी निर्माण होतात. त्यामुळे या सणाच्या माध्यमातूनच लोकांचे परस्परामंध्ये संबंध अधिक दृढ होतात आणि सर्वांना एकात्मतेच्या धाग्याने एकत्र आणून आनंद आणि समृद्धी मिळते. 'सत्यम्, धर्मः, मैत्री च समाजस्य आधारः'- सत्य, धर्म, मैत्री हे समाजाचे पाया आहेत.

'समरसता' म्हणजे समाजातील सर्व घटकांमध्ये भेदाभेद न ठेवता एकत्व, बंधुभाव, आणि समानतेचा भाव निर्माण करणे, हा विचार दिवाळी सणाद्वारे अतिशय सुंदररीत्या व्यक्त झालेला दिसून येतो. दिवाळीच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणणारा प्रेम, सेवा व भक्तीरुपी समरसतेचा सूत्रधागा असतो, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. दिवाळी सणाप्रसंगी आयोजित केलेल्या मेळावे, कार्यक्रम आणि सामुदायिक उत्सवांमध्ये सर्व स्तरांतील लोक एकत्र येतात. पोशाख, सजावट, खाद्यसंस्कृती या सगळ्यातून सांस्कृतिक आदानप्रदान होऊन त्यातून सांस्कृतिक समरसतेचे प्रदर्शन घडते. दिवाळीच्या काळात आपण परस्परांना मदत करतो. समाजातील उच्च-नीच, गरीब-श्रीमंत, काळा-गोरा इत्यादी भेद मनात न बाळगता सर्वजण एकत्र येऊन आरती, भजन, स्वच्छता मोहिमा व सांस्कृतिक कार्यक्रम करतो. याप्रसंगी नृत्य, गायन व वादन यांचा अनोखा संगम पाहवयास मिळतो. भारतीय समाजजीवनात समानता, समंजसपणा, प्रेम, आदर आणि परस्पर सहकार्याने वागण्याची भावना दिसून येते. दिवाळीच्या माध्यमातून आपण भेदभावरहित अशा सामाजिक एकात्मतेचे दर्शन घडवत आनंदाच्या क्षणांची अनुभूती घेत असतो. दिवाळी सण हा सामाजिक ऐक्य, धार्मिक सहिष्णुता आणि मानवतेच्या समरसतेचे प्रतीक असून त्यातून "विविधतेतून एकता" हा उदात्त संदेश प्रत्यक्ष अनुभवायला मिळतो.

"आपण सर्वजण एकाच परमेश्वराची लेकरे आहोत. सर्व जीवात एकच परमात्मा आहे, म्हणून कोणीही मोठा किंवा कोणीही लहान नाही." ही आपली विचारधारा फार प्राचीन काळापासून चालत आलेली असून वेदांनी, संतांनी, विचारवंतांनी आपल्या विचारातून ती वेळोवेळी मांडली आहे. आपण सर्वानी ती स्वीकारली आहे. त्यामुळेच आपण भेदाभेद न मानता एक होऊन देशाला प्रगतीच्या दिशेने नेण्यासाठी मार्गक्रमण करत आहोत. दिवाळी सारख्या सणाच्या माध्यमातून समरसतेमुळे सर्वांना समान संधी देणारी सामाजिक रचना निर्माण होत असते. यावेळी आपण इतरांच्या धर्म, संस्कृती, भाषा, विचारधारा व श्रद्धांचा आदर ठेवून परस्पर सहकार्याची वृत्ती जोपासत असतो. 'समरसता' ही एक समग्र मानवी मूल्य समाजात समानता, बंधुता निर्माण करून एकत्वाची अनुभूती देते. ती व्यक्ती व्यक्ती मधील अहंकार, द्वेष व मत्सर आदींचा त्याग करून एकमेकांत प्रेमभाव व आपुलकी जोपासते. समरसतेमुळे समाजातील प्रत्येक घटकाला प्रगत, स्थिर आणि आनंदी जीवन जगता येते. या सर्व गोष्टी आपल्याला दिवाळी सण साजरा करताना समजतात. दिवाळी हा फक्त एकाच धर्माचा सण नसून, हिंदू, शीख, जैन यांसारख्या विविध धर्मांचे लोक तो साजरा करतात. यातून सांस्कृतिक विविधता दिसून येते. यातूनच माणसा-माणसांतील संबंध अधिक घट्ट होतात आणि सामाजिक समरसतेची भावना अधिक दृढ व मजबूत होते. दिवाळीत आपापले कुटुंबीय, नातेवाईक एकमेकांपासून कितीही दूर असले तरीही ते एकत्र येतात. 'सर्वेभ्यः सखा: सर्वेभ्यः प्रियं भवतु' - दिवाळीत हे लक्षात घेऊन आपण सर्वांसोबत मैत्रीपूर्ण संबंध ठेवतो. लोक एकमेकांच्या घरी जाऊन शुभेच्छा देतात, मिठाई वाटतात, भेटवस्तू देऊन फराळाचा मनमुरादपणे आनंद लुटतात. आपापसांतील वैरभावना विसरून एकमेकांच्या आनंदात सहभागी होतात. 'एकत्वे सर्वजनानां सुखम्' - सर्वांमध्ये ऐक्य असल्यासच आनंद प्राप्त होतो, याची अनुभूती दिवाळीत येते. त्यामुळे दिवाळीच्या उत्सवातून समाजात दीर्घकाळ टिकणारा एकोपा, बंधुभाव व सलोखा वाढतो. समरसता म्हणजे सामाजिक, धार्मिक, जातीय किंवा वैयक्तिक भिन्नता असूनही एकत्र राहणे, सुसंवाद राखणे, वैमनस्य न ठेवता सौहार्दपूर्ण संबंध ठेवणे होय. म्हणूनच, 'सर्वजनहिताय सर्वजनसुखाय' हा उदात्त हेतू नजरेसमोर ठेवून दिवाळी सणातून आपण सर्वांच्या सुखासाठी समरस झालो पाहिजे.

थोडक्यात, 'समरसता' म्हणजे समभावाचा, एकात्मतेचा व सौहार्दाचा व्यापक असा जीवनदृष्टिकोन व्यक्त करणारी भावनायुक्त कृती आहे. समरसता ही केवळ सामाजिक कल्पना नसून जीव व शिव यांना एकत्रित बांधणारी उदात्त व व्यापक अशी भारतीय संस्कृतीची महान विचारधारा आहे. अशी ही 'समरसता' दिवाळी सारख्या सण-उत्सवांमधून सर्वाधिक प्रभावीपणे आणि स्पष्टपणे अगदी सहजतेने दिसून येत असल्याने ती आपण जपली पाहिजे. समाजाच्या सर्वांगीण कल्याणासाठी दिवाळीच्या सणाद्वारे सर्वांनी समान भावना ठेऊन 'समरसता' जोपासली पाहिजे. दिवाळी उत्सवाच्या पावन पर्वावर आपण ऐक्य, सत्य, धर्म, मैत्री, करुणा यांचा स्वीकार करून राष्ट्रकल्याणासाठी समरसता टिकवून ठेवणे, ही काळाची गरज आहे. कारण, 'मित्रत्वं, सहिष्णुता, सौहार्दं च समरसता मूलम्' - मित्रत्व, सहिष्णुता, सौहार्द या सर्व मूल्यांनी समरसतेचा पाया रोवला आहे. समरसतेचा पाया अधिक मजबूत करणे ही आपल्या सर्वांची नैतिक जबाबदारी आहे. हे लक्षात घेऊन समरसतेचा पाया अधिक मजबूत करण्यासाठी दिवाळीच्या या मंगलसमयी सर्वांसाठी प्रार्थना करू या..! 'सर्वे भवन्तु सुखिनः, सर्वे सन्तु निरामयाः' - सर्वजण सुखी राहोत, सर्वजण निरोगी राहोत !

**लेखक - शारदासुत सुनील म्हसकर,**
**पाली-शहापूर (शिक्षणतज्ज्ञ व प्रज्ञावंत साहित्यिक)**
**संपर्क - ९०२९३०२१११ / ९००४१११९५६**










**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अन्यायग्रस्त शेतकऱ्याची न्यायासाठी पुकार

## महसूल विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह; "पुन्हा अन्याय झाल्यास आत्मदहन" - आहेर यांचा इशारा

**अकलापूर. संगमनेर**
**आण्णासाहेब आहेर:**

मौजे अकलापूर येथील शेतकरी श्री एकनाथ बाळाजी आहेर यांनी आपल्या गट नं. ३८/२ मधील ४ एकर १७ गुंठे जमिनीचे भोगवटादार वर्ग २ वरून वर्ग १ मध्ये रूपांतर करण्याबाबत जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांच्याकडे २० नोव्हेंबर २०२३ रोजी अर्ज दाखल केला होता. मात्र, आजअखेर महसूल विभागाकडून कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्यामुळे त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

या प्रकरणात महसूल विभागाचा विलंब, दुर्लक्ष व अन्यायकारक वागणूक यावर गंभीर प्रश्नचिन्हे उपस्थित झाले आहे.

१९६९ पासून सुरू झालेला अन्यायाचा प्रवास:श्री आहेर यांच्या कुटुंबावरील अन्यायाची कहाणी नवी नाही.

त्यांच्या मालकीची सर्वे नं. २२७/५+६+१३+१४+१५ ही जमीन १३ मार्च १९६९ रोजी भू विकास बँक शाखा संगमनेरकडे तारण ठेवण्यात आली होती.

त्या वेळी घेतलेल्या कर्जाची परतफेड पूर्ण होण्यापूर्वीच, ६ फेब्रुवारी १९७० रोजी महसूल अधिकाऱ्यांनी बँकेची परवानगी न घेता चुकीच्या पद्धतीने नियमबाह्य सदर जमीन "लोकोपयोगी सेवेसाठी" घेतली, असा गंभीर आरोप आहेर यांनी केला आहे.

"कर्ज आम्ही घेतले, परतफेडही व्याजासह १९८१ साली केली, पण जमीन मात्र सरकारने निशुल्क घेतली.

जमीन सरकारने घ्यायची आणि कर्ज आम्ही भरायचे.... हा किती मोठा अन्याय आहे, याचा विचारही कुणी केला नाही,"

असा आक्रोश श्री एकनाथ आहेर यांनी व्यक्त केला.

२००१ साली श्री एकनाथ बाळाजी आहेर यांचा नियमबाह्य जमीन सरकारने हस्तांतर करून लोकोपयोगी सेवेसाठी वापरल्या बाबत पर्यायी जमीन मिळण्याबाबतचा अर्ज, २००८ मध्ये मंजुरी...पण ताबा मात्र २०१५ साली मिळाला....

अन्यायाची दखल घेण्यासाठी २ ऑगस्ट २००१ रोजी श्री आहेर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज दाखल केला. दीर्घ चौकशीनंतर प्रशासनाने गट नं. ३८ मधील ४ एकर १७ गुंठे पर्याय जमीन मंजूर केली.

पर्यायी जमीन विनामूल्य देणे क्रमप्राप्त असतानाही १,४६,००० शासकीय शुल्क १८ मार्च २००८ रोजी वसूल करण्यात आले.

सदर जमिनीचा सातबारा तयार झाला तरी ताबा देण्यासाठी तब्बल सात वर्षे विलंब झाला.

शेवटी २७ फेब्रुवारी २०१५ रोजी ताबा मिळाला, तोपर्यंत श्री आहेर शेतकरी कुटुंबाला प्रचंड नुकसान सहन करावे लागले.

"जमिनीचा ताबा मिळेपर्यंत आहेर कुटुंबाने जवळजवळ अर्ध आयुष्य सरकारी कार्यालयांच्या उंबरठ्यावर घालवले."

मिळालेल्या पर्याय जमिनीचे गट नं. ३८/२ च्या वर्ग बदलाची मागणी प्रलंबित:सध्या श्री आहेर यांनी गट नं. ३८/२ मधील जमीन भोगवटादार वर्ग दोनवरून वर्ग १ मध्ये रूपांतरित निशुल्क करण्याची मागणी २०/११/२०२३ मध्ये केलेली आहे.

अप्पर जिल्हाधिकारी शिर्डी बाळासाहेब बापूराव कोळेकर यांनी या प्रकरणाची चौकशी करून सकारात्मक निर्णय देण्याचे आश्वासन दिले होते.

तहसीलदार,संगमनेर यांनीही आपल्या अहवालात श्री आहेर यांची जमीन लोकोपयोगी सेवेसाठी {गावठाण वर्ग )वापरण्यात आलेली जमीन ही आहेर कुटुंबाची त्यांचीच मूळ मालकीची होती,भोगवटादार वर्ग एक असल्याचे स्पष्ट नमूद केले आहे.

तरीही जिल्हाधिकारी कार्यालयाकडून गट नंबर ३८/२ मधील ४ एकर १७ गुंठे जमीन भोगावटादार वर्ग २ ची भोगवटादार १ करण्याचे आदेश संगमनेर तहसीलदार यांना निर्गमित झालेले नाहीत.

शेतकरी आहेर कुटुंबाची वेदना : "आता तरी आमची दिवाळी गोड होणार का?"...

"ज्या शेतकऱ्याची जमीन सरकारने लोकोपयोगी सेवेसाठी घेतली, त्याच्यावर पुन्हा पुन्हा अन्याय होतोय.. आम्हाला सरकारने कर्जबाजारी केले आहे आम्ही न्याय मागतो आहोत,"

असे श्री एकनाथ बाळाजी आहेर यांनी सांगितले,त्यांनी महसूल विभागाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करत आत्मदहनाचा इशारा दिला आहे. "पुन्हा अन्याय झाल्यास त्याची जबाबदारी महसूल विभागावर असेल,"असा त्यांचा इशारा असून, त्यांनी प्रशासनाकडून तत्काळ निर्णयाची मागणी केली आहे.

महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघ ने आहेर कुटुंबाला पाठिंबा दर्शविला असून,"महसूल विभागाच्या निष्क्रियतेमुळे शेतकऱ्यांचा विश्वास ढासळतो आहे," महसूल अधिकारी सक्षमपणे आहेर कुटुंबाला न्याय देतील अशी अपेक्षा आहे ...अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.श्री आहेर यांची जमीन शासनाने लोकोपयोगी सेवेसाठी नियमबाह्य हस्तांतरित करून मोफत वापरलेली असून पर्यायी जमिनीचे २००७-२००८ साली सरकारने संपूर्ण शुल्क घेतलेले असताना त्याच जमिनीचे पुन्हा पुन्हा शुल्क घेणे योग्य नाही व एका जमिनीचे दोन वेळा शुल्क घेणे अन्यायकारक आहे दरम्यान,जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांनी या प्रकरणावर दिवाळीपर्यंत न्याय द्यावा अन्यथा महसूल विभागाची चुकीची कार्यपद्धतीवर आवाज उठवत वेळोवेळी अन्याय व श्री आहेर कुटुंबाच्या नुकसानीची भरपाई मिळावी अशी मागणी शासनाकडे केली जाईल असे मत महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघटनेचे अध्यक्ष मा.प्रकाश पाटकर यांनी व्यक्त केले आहे.न्यायासाठी शेतकरी आहेर कुटुंबाची लढाई -प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा:गेल्या पाच दशकांपासून न्यायासाठी संघर्ष करणाऱ्या आहेर कुटुंबाचा विश्वास पुन्हा जिंकण्यासाठी प्रशासनाने त्वरित निर्णय घेणे अत्यावश्यक आहे.ग्रामीण भागातील शेतकऱ्यांवर झालेला हा अन्याय दूर करून "शेतकऱ्याला त्याचा हक्काचा न्याय" मिळवून देणे हीच खरी दिवाळी ठरेल, अन्यायाची मालिका महसूल विभाग थांबवेल का? व आहेर कुटुंबाला न्याय मिळेल का ? हे पाहणे औचित्याचे ठरेल

## मुकुंदराव बळीराम खंदारे यांचा सेवा गौरव सोहळा उत्साहात केला साजरा.




**दैनिक युवक आधार**
**परतूर-जालना(अशोक ठोके)**

दि.16 ऑक्टोबर 2025 रोजी लालबहादूर शास्त्री विद्यालय पारडगाव येथील शिक्षक मुकुंदराव बळीराम खंदारे हे 38 वर्षाच्या प्रदीर्घ अध्यापनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झाले. त्याबद्दल शाळेच्या व संस्थेच्या वतीने त्यांचा सेवा गौरव पूर्ती सोहळा साजरा करण्यात आला. आर.सी.सी मित्र मंडळ परतुर व बुद्धभूषण मित्र मंडळ परतुर यांच्यावतीने मुकुंदराव खंदारे सर व सौ.सविता खंदारे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला यावेळी राहुल नाटकर, प्रदीप साळवे, दीपक हिवाळे, स्वप्निल पहाडे, प्रवीण दवंडे, प्रकाश वेडेकर, घेणाजी साळवे, लक्ष्मण वंजारे, भीमराव गायकवाड, दिलीप साळवे केतन खंदारे डॉ.सुचेतन खंदारे, संकेत चव्हाण, महेंद्र खंदारे, राहुल पहाडे, रवी इंगळे, पंकज इंगळे आदींची उपस्थिती होती.

## लोक गौरव राष्ट्रीय एकात्मता परिषद तर्फे राष्ट्रीय एकता सन्मान महासोहळा संपन्न



**दैनिक युवक आधार**
**पंडीत फंगाळ (पनवेल) :**

लोक गौरव राष्ट्रीय एकात्मता परिषद आणि एम.व्ही.एस यांच्या संयुक्त विद्यमाने ६ व्या वर्धापन दिनानिमित्त साहित्य मंदीर, वाशी, येथे आयोजित करण्यात आलेला " राष्ट्रीय एकता सन्मान महासोहळा" नुकताच मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

एन.डी.खान यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या सदर पुरस्कार सोहळयाच्या संयोजिका सौ.सलमा खान होत्या.लेफ्टंट कमांडर निलेश झोपे, महाराष्ट्राचे ख्यातनाम गझलकार ए.के.शेख, प्रसिद्ध अभिनेत्री आदिती सारंगधर, कस्टम व सेन्ट्रल एक्साईज चे माजी आयुक्त सुधाकर पाटील, जेष्ठ समाजसेविका उषा दत्त, सहाय्यक पोलीस आयुक्त रामचंद्र नागरगोजे, शिवाजीराव एस.जोंधळे विधी व संशोधन महाविद्यालय आसनगाव च्या प्राचार्या डॉ.पौर्णिमा सूर्वे,सिने दिग्दर्शक अल्ताफ शेख, अभिनेत्री उर्मिला डांगे आणि चित्रपट कलाकार कु.केतकी गावडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.विविध क्षेत्रात उल्लेखनीय व अनमोल कार्य करणाऱ्या सेवाव्रतींचा मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रीय प्राऊड लिडरशिप आयकॉन पुरस्कार व राज्यस्तरीय लोकसेवा गौरव पुरस्कार आणि सन्मानपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.यावेळी गझल क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल ए.के.शेख सरांना" जीवनगौरव" पुरस्कार प्रदान करण्यात आला. सर्व पुरस्कार्थींनी बांधलेला फेटा हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले.

याप्रसंगी टी.एम.जी.क्रीयेशन. व स्वरसंस्कार संगीत विद्यालय प्रस्तुत हिंदी व मराठी गाण्यांचा " सूरबालगंधर्व सुरेल मैफल" या कार्यक्रमात स्वरसंस्काराच्या बाल कलाकारांनी सादर केलेल्या एकापेक्षा एक सादर केलेल्या मराठी आणि हिंदी गीतांना उपस्थितांनी टाळ्यांनी दाद दिली.सदर पुरस्कार दरम्यान डॉ.विजय मोरे आणि सौ.विद्या डोंबे यांनी सादर केलेले हिंदी गीत सुध्दा रसिकांना भावले. त्याचप्रमाणे शब्दश्री विलास देवळेकर यांनी इकोच्या स्वरात सादर केलेली कवितेने उपस्थितांना हसण्यास भाग पाडले.पुरस्कार सोहळ्याचे सूत्रसंचालन पल्लवी वढवेकर - बर्वे आणि दिपक कदम यांनी उत्कृष्टपणे केले .तर संगीतमय कार्यक्रमाचे अप्रतिम निवेदन कु.देवश्री घोडके आणि कु.स्वरा घरत यांनी केले.सदरहु भव्य पुरस्कार सोहळा यशस्वी करण्यासाठी राजकुमार ताकमोगे, विलास देवळेकर,फीरोज पटेल,डॉ.श्रेयशी गोंडाबे, सौ.मीना ताकमोगै,सौ.स्नेहा चांदोरकर, डॉ.ईसा शेख, विजय भोसले, प्रतिभा किर्ती कर्वे, नंदिनी सुकाळे, डॉ.शेलेंद्र पवार, डॉ.विजय मोरे, गुलाब सलाट यांनी परीश्रम घेतले.

## "भुसावळच्या सुरेखा इंगळे यांना मानव अधिकार महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी"

**दैनिक युवक आधार**
**भुसावळ**

दिनांक 10 ऑक्टोबर 2025 भुसावळ येथील शासकिय रुग्णालयातील जी एन एम सुरेखा इंगळे यांची मानव अधिकार आंतरराष्ट्रीय फेडरेशनवच्या महिला आघाडी जळगांव जिल्हाध्यक्ष पदी निवड. भुसावळ येथील शासकिय रुग्णालयात कार्यरत असलेल्या सुरेखा इंगळे यांची मानव अधिकार आंतरराष्ट्रीय फेडरेशन महिला आघाडी जळगांव जिल्हाध्यक्ष पदी निवड करण्यात आली असुन त्यांना कर्नाल हरियाणा येथे कार्यक्रमा दरम्यान अँटी करप्शन मानव अधिकार आंतरराष्ट्रीय फेडरेशन सुप्रिमो डॉ. नरेंद्र अरोरा मानव अधिकार आंतरराष्ट्रीय फेडरेशन राष्ट्रीय अध्यक्ष रनज्योत सिंग मानव अधिकार आंतरराष्ट्रीय फेडरेशन महाराष्ट्र राज्य अध्यक्ष प्रा. संजय मोरे यांच्या हस्ते नियुक्ती







पत्र देऊन निवड करण्यात आली असुन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय अध्यक्ष रनज्योत सिंग हे उपस्थित होते तर प्रमुख अतिथी म्हणुन सिने अभिनेत्री पद्मिनी कोल्हापुरे सिने अभिनेता शाहाबाज खान फिल्म दिग्दर्शक विजय टंडन अँटी करप्शन नॅशनल चिफ डायरेक्टर महाराष्ट्र राज्य मृणाल इनामदार महाराष्ट्र राज्य चिफ डायरेक्टर प्रल्हाद बोंडे संजय धनगर अनिल तायडे रवींद्र इंगळे ईत्यादि उपस्थित होते. निवड झाल्याबद्दल मानव अधिकार आंतरराष्ट्रीय फेडरेशन राज्य उपाध्यक्ष प्रशांत जाधव मानव अधिकार राज्य डॉ.महेंद्र भालेराव उपाध्यक्ष इंजी. वैष्णवी मोरे मानव अधिकार मुंबई जिल्हाध्यक्ष किशोर गुडेकर सपना इंगळे उपप्राचार्य विवेक बोंडे मानव अधिकार मानव अधिकार जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब शिरतुरे डॉ.महेंद्र सुरवाडे डॉ. धनराज बावस्कर प्रथमेश इंगळे यां सह नातेवाईक आणि मित्र परिवार यांनी अभिनंदन केले आहे.

# जल, ऊर्जा आणि हवामानबदल विषयक कृतींना जोडून शाश्वत विकासाकडे वाटचाल

**मुंबई (विशाल कारंडे) :** हवामान बदलासंदर्भातील उपाययोजना आणि कृती संदर्भातील कार्यवाही राज्य अधिक वेगाने राबवत आहे. याचबरोबर, स्थानिक पातळीवर निसर्गावर आधारित उपायांना प्रोत्साहन देणे आणि त्यासाठी वित्तपुरवठा स्थानिक स्तरावर उपलब्ध करून देणे या विषयांवरही मुंबईत झालेल्या पत्र सूचना कार्यालय (PIB) आणि युनिसेफ यांच्या संयुक्त परिसंवादात चर्चा झाली.

पर्यावरण विषयक जनजागृती आणि संवाद अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने, पत्र सूचना कार्यालय आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबईत माध्यमांशी चर्चा करण्यात आली. या चर्चेत सामूहिक हवामान बदल प्रयत्न, युवकांचा सहभाग आणि शाश्वत जल-ऊर्जा प्रारूपांचा महाराष्ट्रात वापर करण्यावर भर देण्यात आला .

जलसुरक्षा, ऊर्जा संक्रमण आणि सामूहिक सहभाग या एकात्मिक दृष्टिकोनातून महाराष्ट्र राज्य हवामान बदलाशी सुसंगत विकासाचे आघाडीचे उदाहरण ठरत आहे. राज्यातील सुमारे ९० टक्के ग्रामीण लोकसंख्या भूजलावर अवलंबून असून, बहुतेक भाग खडकाळ किंवा पर्जन्यछायेचा आहे. त्यामुळे हवामान बदलाशी सुसंगत कृती राबविण्याची अत्यंत गरज निर्माण झाली असल्याची चर्चाही परिसंवादात करण्यात आली.

पत्र सूचना कार्यालयाच्या (पश्चिम विभाग) महासंचालक स्मिता वत्स शर्मा यांनी प्रसारमाध्यमांच्या भूमिकेबाबत सांगितले की, माध्यमे नागरिकांमध्ये केवळ जागरूकता निर्माण करत नाहीत, तर पर्यावरण विषयक प्रश्नांकडे शासनाचे लक्ष




वेधून माहितीपूर्ण निर्णय घेण्यास आणि लोकसहभाग वाढविण्यास मदत करतात.

भारत सरकारच्या 'लाईफ' मोहिमेच्या माध्यमातून जलसंवर्धन आणि शाश्वत जीवनशैलीला सक्रिय प्रोत्साहन दिले जात आहे. 'अमृत सरोवर' अभियानांतर्गत ग्रामीण भारतातील ६८ हजारांहून अधिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन झाले असून, भूजलपातळी सुधारली आहे. शाळांमधील इको क्लब्स विद्यार्थ्यांना पाणी बचतीची सवय लावून जबाबदार नागरिक बनविण्यास हातभार लावत आहेत.

राज्यातील हवामान बदलावरील राज्य कृती आराखडा कृषी, जल, आरोग्य आणि परिसंस्थेशी निगडित आव्हानांना तोंड देण्यासाठी मार्गदर्शक ठरत आहे. त्यावर आधारित 'माझी वसुंधरा अभियान' राज्यातील २७ हजार गावे, ४०० शहरी स्थानिक संस्था आणि ५०० महाविद्यालयांपर्यंत पोहोचले असून, ऊर्जा, जल, शुद्ध हवा, कचरा आणि जैवविविधता या घटकांवर पाच-कलमी अजेंडा राबविला जात आहे.युनिसेफच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या सौर ऊर्जेवर चालणाऱ्या जलयोजनांमुळे दुष्काळप्रवण भागांमध्ये ऊर्जा खर्चात ८० टक्क्यांपर्यंत बचत झाली आहे आणि पाणीपुरवठ्याची विश्वासार्हता वाढली आहे. ग्रामीण समुदाय पृष्ठभागावरील जलस्रोतांचा प्रभावी वापर करून टंचाईच्या काळातही शाश्वत उपाय अवलंबत आहेत.

युवाशक्तीच्या सहभागातून राज्यात राबविण्यात आलेल्या जल व्यवस्थापन कार्यक्रमांद्वारे १३ जिल्ह्यांतील १० लाखांहून अधिक विद्यार्थी वॉश ऑडिट, प्लास्टिकमुक्त मोहिमा, हवामान बदल कॅम्पस प्रयोगशाळा आणि चक्राकार अर्थव्यवस्था यासारख्या उपक्रमांत सक्रिय आहेत. या मोहिमांची व्याप्ती आठ लाखांहून अधिक नागरिकांपर्यंत पोहोचली आहे.माझी वसुंधरा अभियानाचे मिशन डायरेक्टर सुधाकर बोबडे म्हणाले की, हे अभियान देशातील सर्वात समग्र आणि एकात्मिक पर्यावरणीय उपक्रमांपैकी एक असून, स्थानिक प्रशासनाच्या केंद्रस्थानी हवामान बदल अनुकूलन धोरणांची अंमलबजावणी करत आहे.

# कुरूळा जिल्हा परिषद गटात मोर्चेबांधणीला सुरुवात तर, अनेक दिग्गज मंडळी उतरणार रिंगणात









**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी कुरूळा :प्रशांत ढवळे**

येत्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीच्या पार्शवभूमीवर कुरूळा सर्कल मध्ये ऐन दिवाळीत राजकीय आताषबाजी रंगण्याची शक्यता आहे. थंडीच्या वातावरणात राजकारण तापण्याचे संकेत असून कुरूळा जिल्हा परिषद गट सर्वसाधारण प्रवर्ग साठी राखीव झाला आहे तर कुरूळा पंचायत समिती गण आहे ओबीसी पुरुष साठी राखीव आहे तर दिग्रस (बु )गण अनुसूचित जाती महिला साठी राखीव झाला आहे. या निवडणुकी कडे सर्वांचे लक्ष लागले आहे. २०१७नंतर आठ वर्षाच्या प्रदीर्घ प्रतीक्षनंतर होणारी निवडणूक राजकीय दृष्ट्या महत्वाची ठरणार आहे. तर गाओ गावी अनेकांनी आतपासून मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे यामुळे काहीना नव्याने संधी मिळणार असून निवडणुकी साठी इच्छुक उमेदवारांनी भेटीगाटी घेण्यास सुरुवात केली आहे. तर प्रमुख राजकीय पक्षातील स्थानिक नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागणार आहे.

या निवडणुकी साठी जिल्हा परिषद गट मध्ये भारतीय जनता पक्षाच्या महिला नेत्या तथा जिल्हा सरचिटणीस चित्रेखा ताई गोरे या भाजपा कडून निवडणुक लढणार आहेत त्या एकमेव महिला इच्छुक उमेदवार आहेत . तर सामाजिक कार्यकर्ते मारोती गवळे हे देखील या गटातून इच्छुक आहेत ते सुद्धा भारतीय जनता पार्टी कडून थांबणार आहेत. गेली अने वर्षा पासून ते या भागात सामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी अग्रेसर आहेत. तर डॉ. तुषार राठोड साहेब यांचे ते विश्वासू मानले जातात त्यांना तिकीट मिळण्याची दाट श्यक्यता आहे. तर माजी पंचायत समिती सदस्य तथा कुरूळा गावचे सरपंच बाळासाहेब गोमारे हे सुद्धा ही निवडणूक लढणार आहेत गावातील नागरिकांन सोबत व सर्कल मधील सर्वांन सोबत त्यांचा दांडग जनसपंर्क आहे त्यांच्या मोठया वहीनी सौं. सोभाताई रमेश गोमारे ह्या विध्यमान जी. प सदस्य आहेत. त्यांना याचा फायदा होण्याची दाट श्यक्यता आहे पन ते अपक्ष लढणार का कोणत्या पक्षा कडून तिकीटावर लढणार हे अजून स्पष्ट झाले नाही. शिवकुमार भोशिकर हे सुद्धा राष्ट्रवादी (अजितदादा )गट कडून ह्या निवडणुकी मध्ये उतरणार आहेत. ते जिल्हा मध्यवर्ती बँक चे संचालक असून तळा गाळातील जनते सोबत त्यांचा चांगला सपंर्क आहे.तर शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे शिवसेना तालुका प्रमुख परमेश्वर जाधव पाटील हे पक्षा कडून निवडणूक लढणार आहेत ते निष्ठवान आहेत.युवा कार्यकर्ते सचिन जेरिकोटे हे सुद्धा यानिवडणुकी मध्ये शिवसेना शिंदे गटा कडून उतरणार आहेत.

तर पंचायत समिती दिग्रस( बु ) गणातुन कुरूळा सर्कल मधील सामाजिक कार्यकर्ते आमदार डॉ. तुषार राठोड यांच्या अंत्यन्त विश्वासू बहुजन चळवळी चे युवा नेते सर्व सामान्य माणसाचा आवाज असलेले माणिक भाऊ ढवळे यांच्या पत्नी सौ. ज्योतीताई माणिक ढवळे या निवडणूक लढवणार आहेत.माणिक ढवळे यांनी भेटी गाठी घेण्यास सुरुवात केली आहे. तर कुरूळा गण पंचायत समिती साठी जेष्ठ भाजपा नेते यादव आना चिवडे हे इच्छुक आहेत. तर अनेक युवक मंडळी सुद्धा पंचायत समिती साठी उतरणार आहे त्यामध्ये सुरेश कोळगीर राष्ट्रवादी अजित पवार गट तर , शिवम मरशीवणे काँग्रेस पक्ष.राजीव मुकनर भाजपा, भगवान राठोड भाजपा, श्रीनिवास गुटे अपक्ष /काँग्रेस कडून निवडणूक लढणार आहेत तर सर्व पक्षीय नेत्यांनी भेटीगाठी ला सुरुवात करुन मोर्चे बांधणीला सुरुवात केली आहे पण येणाऱ्या काळात पक्ष कोणाला संधी देणार कोणाला डावलणार कोण रिंगनात टिकणार कोण माघार घेणार ह्या कडे जनतेचे लक्ष लागलेआहे.

## स्वामी विवेकानंद वाचनालयात माजी राष्ट्रपती कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा



**दैनिक युवक आधार**
**रिसोड/तालुका प्रतिनिधी रणजितसिह. ठाकूर**

**रिसोड:**स्थानिक स्वामी विवेकानंद सार्वजनिक वाचनालयात १५ ऑक्टोबर माजी राष्ट्रपती भारतरत्न एपिजे अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला.कार्यकर्माच्या अध्यक्षस्थानीस्वामी विवेकानंद वाचनालयचे संस्थापक अध्यक्ष प्रा. कमलाकर टेमधरे, प्रमुख अतिथी म्हणून प्रा. नंदन खैरे उपस्थित होते.सर्वप्रथम एपिजे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच वाचन प्रेरणा दिनानिमित्त ग्रंथ प्रदर्शनीचे सुद्धा उदघाटन करण्यात आले. कार्यकर्माचे प्रास्ताविक के ना इंगळे यांनी केले. प्रा नंदन खैरे यांनी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना अब्दुल कलाम यांच्या जीवनातील पुस्तकांच्या योगदानाचे महत्व सांगितले. कलाम यांनी देशाच्या क्षेपणास्त्र क्षेत्रात अमूलाग्र योगदान दिले त्यामुळे त्यांना मिसाईल मॅन ही उपाधी भारतीयांनी दिली. सर्वधर्म समभाव, आध्यत्मिक प्रतिष्ठा, वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश त्यांनी आयुष्यभर दिला म्हणून कलाम यांना देशातील सर्व जाती धर्मातील लोकं त्यांना अतिशय आदराने अभिवादन करतात. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना वाचन प्रेरणा दिवसानिमित्त वाचनाची प्रेरणा देणारे उपक्रम राबवावे तसेच शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना जाणीवपूर्वक वाचणासाठी प्रेरित करण्याची आवश्यकता असल्याचे मनोगत त्यांनी व्यक्त केले.प्रसंगी माजी पोलीस उपनिरीक्षक वामन वाठोरे, प्रा. शरद टेमधरे, रवि अंभोरे यांनी प्रेरणादायी विचार मांडले.

कार्यकर्माचे प्रास्ताविक केशव इंगळे यांनी, सूत्रसंचालन प्रा. शालिकराम पठाडे यांनी तर आभार ग्रंथपाल गजानन तारापुरे यांनी मानले.

## जाफराबाद येथे अनुसूचित जातीचे अबकड उपवर्गीकरण व्हावं म्हणून मातंग समाजाचा भव्य मोर्चा

**दैनिक युवक आधार**
**जाफराबाद टेंभूर्णी प्रतिनिधी -अनिल ससाने**

एक ऑगस्ट रोजी 2024 रोजी सुप्रीम कोर्टाने अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण व्हावं म्हणून निर्णय दिला त्या अनुषंगाने जाफराबाद येथे मातंग समाजाच्या वतीने व लहू शस्त्र सेनेचे संस्थापक अध्यक्ष संजूबाबा गायकवाड यांच्या निदर्शनाखाली भव्य मोर्चा काढण्यात आला या मोर्चाला सामाजिक कार्यकर्ते मच्छिंद्र सकटे ललित कुचेकर बंडूभाऊ डोईफोडे राजू निकाळजे हे उपस्थित होते मच्छिंद्र सकटे दैनिक युवक आधारच्या पत्रकाराशी बोलताना म्हणाले की बदर समितीने लवकरात लवकर अनुसूचित जातीचा उपवर्गीकरणाचा अहवाल तयार करून शासनाकडे द्यावा व शासनाने लवकरात लवकर अनुसूचित जातीचे अ ब क ड उपवर्गीकरण कराव अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण करण्यास विलंब लावल्यास आम्ही नागपूर येथे हिवाळी अधिवेशनामध्ये ठिया मांडून बसू व उपवर्गीकरण करण्यास भाग पाडू असे ते म्हणाले लहू शस्त्र सेनेचे संस्थापक संजूबाबा गायकवाड आमच्या प्रतिनिधीशी बोलताना म्हणाले की आता जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यसाठी सत्ताधारी पक्षाने आमच्या समाजाला संधी द्यावी असे ते म्हणाले व समाजाला संबोधित केले की आपण आपल्या समाजातील माणसाला संधी मिळाल्यास त्याला शंभर टक्के मतदान करून निवडून द्यावं असे ते म्हणाले या मोर्चाला जाफराबाद तालुक्यातील संपूर्ण मातंग समाज व संपूर्ण सामाजिक संघटना उपस्थित होत्या विशेष करून लहू शस्त्रसेनेचे कार्यकर्त्याचा मोर्चाला सहभाग होतो



## दि चाइल्ड प्रॉडीजी इंटरनॅशनल प्री स्कूल उरण शाळेत लहान उद्योजक दिन उत्साहाने साजरा

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

प्री स्कूल म्हणजे प्राथमिक शाळा सुरू होण्यापूर्वी मुलांना बालपणीचे शिक्षण देणारी एक शाळा होय. ज्याला प्ले स्कूल किंवा नर्सरी असेही म्हणतात. या शाळेचा मुख्य उद्देश मुलांना खेळकर आणि मजेदार पद्धतीने शिक्षण देणे,त्यांच्यातील संवाद वाढवणे त्यांचा भावनिक व शारीरिक विकास करणे आणि पुढील औपचारिक शिक्षणासाठी त्यांना तयार करणे त्यामुळे या शाळा मुलांच्या उत्सुकतेला व कल्पनाशक्तीला चांगली चालना देत असतात. मुलांना शिकण्याची आवड निर्माण होते अक्षर आणि संकल्पनांची ओळख होते.

उरण मध्ये दि चाइल्ड प्रॉडीजी इंटरनॅशनल प्री स्कूल येथे दिनांक ११ ऑक्टोबर रोजी आशियाना बीच रिसॉर्ट उरण येथे "लहान उद्योजक दिनाचे आयोजन करण्यात आले होते. लहान उद्योजक दिन ही संकल्पना शाळेच्या प्राचार्या श्लोक पाटील मॅडम यांनी मांडली.

आणि ही संकल्पना साकार करण्यासाठी श्लोक मॅडम यांनी लहान मुलांसाठी पैशांची देवाण-घेवाण, खरेदी विक्री पैशांचे मूल्य, पैसे कसे कमवायचे, कसे खर्च करायचे हे ज्ञान होण्यासाठी या उद्योजक दिनाची संकल्पना मुलांसाठी अंमलात आणली. त्यानुसार प्रत्येकी ४ सदस्यांसह ३० मुलांनी या संकल्पनेसाठी सहभाग घेतला.




या अशा कार्यक्रमामुळे मुलांच्यातील एकमेकातील संवाद ,एकमेकांच्या सहकार्यातून काम करणे, सहकार्याची भावना वाढवणे ,नेतृत्व कसे असावे, प्रत्यक्ष पैसे खर्च करण्याचा आणि पैसे कमावण्याचा आनंद आणि अनुभव या उपक्रमातून मुलांना मिळाला. त्याचप्रमाणे काल्पनिक शिक्षणापेक्षा स्वतः कृती करून वास्तविक जगात स्व अनुभवाने ज्ञान मिळवण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला. यामधून मुलांना शैक्षणिक ज्ञाना सोबतच स्वावलंबन आणि आत्मसन्मानाची जाणीव झाली.

हा कार्यक्रम सुंदर रित्या पार पाडण्यासाठी मुलांच्या पालकांनी देखील खूप मेहनत घेतली. आणि याकरता वेळ दिला. प्रत्यक्ष पालकांनाही सहभाग घेतल्यामुळे त्यांनाही या संकल्पनेतून आनंद मिळाला.

दि चाइल्ड प्रॉडीजी इंटरनॅशनल प्री स्कूल च्या प्राचार्या श्लोक मॅडम स्वतः मुलांमध्ये समरस होऊन अशा उपक्रमांतून मुलांच्या ज्ञानात भर पडण्यासाठी विविध उपक्रम राबवत असतात. त्यातून मुलांच्या कलागुणांना वाव मिळत असतो. आणि सण उत्सव साजरे करून आपल्या संस्कृतीची माहिती मुलांना कार्यक्रमातून मिळत असते. शिक्षणासोबतच सामान्य ज्ञानाची वाढ होते. या करता शाळेच्या प्राचार्या श्लोक मॅडम नेहमीच मेहनत घेत असतात .यावेळी मुलांच्या पालकांनी प्राचार्या श्लोक मॅडम यांचे आभार व्यक्त केले. लहान उद्योजक दिन या उपक्रमात मुलांनी एकूण २६ स्टॉल उभारले होते .यामध्ये खाण्याच्या पदार्थांसोबतच खेळांचे स्टॉल, खेळणी, हस्तनिर्मित वस्तू, ब्रेसलेट, कानातले ,चॉकलेट्स असे विविध प्रकारचे स्टॉल्स मांडले होते

लहान मुलांसाठी हा एक वेगळा अनुभव होता. शिक्षणातून व्यावहारिक ज्ञानाची भर पडली.

## शहर शिवसेनेच्या वतीने किल्ले बांधणे स्पर्धा



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी**

नळदुर्ग शहरातील ऐतिहासिक किल्ला असल्याने सालाबाद प्रमाणे याही वर्षी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास जोपासण्यासाठी किल्ले बांधणे स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे या स्पर्धेसाठी प्रथम बक्षीस माजी नगराध्यक्ष श्री .दिलीप आप्पा कुलकर्णी यांच्या वतीने (३००१) रुपये तसेच द्वितीय बक्षीस माजी नगरसेवक श्री .संजय आण्णा बताले यांच्या वतीने (२५०१) व तृतीय बक्षीस श्री.सुशांत भुमकर यांच्या वतीने ( २००१) रुपये तर चतुर्थ बक्षीस श्री.अजय दासकर यांच्या वतीने ठेवण्यात आले आहे ही किल्ले बांधणे स्पर्धा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या वतीने जवळपास वीस वर्षापासून नळदुर्ग शहरात ही स्पर्धा आयोजित करत असतात स्पर्धेचे परीक्षक व निरक्षक म्हणून शहर शिवसेनेच्या वतीने केले जाते याचे बक्षीस पाडव्यादिवशी दिले जाते

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## महात्मा फुले महाविद्यालयात वाहतूक नियम व सायबर सुरक्षेवर प्रबोधन




**महात्मा फुले महाविद्यालयात वाहतूक शाखा नवीन पनवेलतर्फे विद्यार्थ्यांना प्रबोधन करताना पो.उपनिरीक्षक सुशांत खराटे व हेड कॉन्स्टेबल वाघ.**

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, प्रतिनिधी**

नवीन पनवेल वाहतूक शाखेतर्फे महात्मा फुले कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, डोंबाळे (ता. पनवेल, जि. रायगड) येथे विद्यार्थ्यांसाठी वाहतूक नियम व सायबर सुरक्षाविषयी प्रबोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमात पोलीस उपनिरीक्षक सुशांत खराटे व हेड कॉन्स्टेबल वाघ यांनी विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियम समजावून सांगत सुरक्षित वाहनचालना करण्याचे आवाहन केले. त्यांनी गाडी चालवताना सीट बेल्टचा वापर, दारू पिऊन वाहन न चालवणे, लेन कटिंग टाळणे, मोबाईल फोनचा वापर न करणे, उलट्या दिशेने वाहन न चालवणे, आणि रस्त्यावर वाहन पार्क न करणे अशा महत्त्वपूर्ण नियमांचे पालन करण्यावर भर दिला.

तसेच विद्यार्थ्यांनी लायसन्स मिळेपर्यंत कोणतेही वाहन चालवू नये, तसेच हे नियम आपल्या पालकांनाही समजावून सांगावेत असे सांगण्यात आले.

कार्यक्रमात वाढत्या सायबर गुन्ह्यांविषयी मार्गदर्शन करताना इंटरनेट वापरताना घ्यावयाची काळजी, सायबर फसवणुकीचे प्रकार आणि प्रतिबंधात्मक उपाय सांगण्यात आले. नागरिकांना मदतीची आवश्यकता असल्यास सायबर हेल्पलाइन 1930 आणि पोलीस आपत्कालीन क्रमांक 112 चा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले.

यावेळी बालविवाह कायदा व त्याचे दुष्परिणाम यावरही सविस्तर माहिती देण्यात आली व समाजात बालविवाह होऊ नयेत यासाठी जागरूकता निर्माण करण्याचे आवाहन करण्यात आले.

या प्रबोधन कार्यक्रमास इयत्ता अकरावी व बारावीतील सुमारे 200 ते 220 विद्यार्थी आणि प्राध्यापक वर्ग उपस्थित होते.

# अंभोरा शाळेत साकारला साक्षात प्रतापगड !

## विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी उभारली ३५ फूट लांबीची भव्य प्रतिकृती

**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी - बाळासाहेब रकटाटे**

शिवछत्रपतींच्या पराक्रमाच्या साक्षीदार राहिलेल्या शिवकालीन 12 गडकिल्ल्यांना युनेस्कोने यावर्षी जागतिक ख्यातीच्या वास्तू म्हणुन मान्यता दिली आहे. या गड दुर्गांपैकी सर्वात कठीण अशा जावळीच्या खोऱ्यात वसलेल्या प्रतापगड या किल्ल्याची हुबेहुब प्रतिकृती जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा अंभोरा या ठिकाणी विद्यार्थी आणि शिक्षकांनी या शैक्षणिक सत्राच्या समारोपप्रसंगी उभारली आहे. ही भव्य प्रतिकृती पाहताना साक्षात प्रतापगड किल्ला अंभोरा शाळेमध्ये वसला की काय असा भास होत आहे.



आपल्या मराठी मनाचा आणि मानाचा मानबिंदू म्हणजे आपला शिवकाळ. हा दैदीप्यमान शिवकालीन स्वराज्य ज्या भूमिवर घडले ते सर्व गडकिल्ल्यांच्या परिसरात होते. हे गडकिल्ले म्हणजे आपले वैभव आहे. त्याच्या माहिती व संस्कार आपल्या विद्यार्थ्यांच्या मनावर व्हावेत या भूमिकेतून जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा अंभोरा येथील शिक्षकांनी यावर्षी प्रतापगड किल्ल्याची वास्तव प्रतिकृती आपल्या शाळा परिसरात उभारण्याचे ठरविले. विद्यार्थ्यांच्या सहकार्याने अवघ्या ५ दिवसांमध्ये २५ फुट रुंद व ३५ फूट लांब आकाराच्या भव्यदिव्य प्रतापगड किल्ल्याची प्रतिकृती शाळा परिसरात तयार करण्यात आली आहे. या प्रतिकृती मध्ये महादरवाजा, सूर्य बुरुज, बुजलेले द्वार, उध्वस्त द्वार, बाजारपेठ, चोर दरवाजा, भवानी माता देवीचे मंदिर, केदारेश्वर मंदिर, मुख्य बाले किल्ला, शौचकुप, रेडका बुरुज, उध्वस्त वास्तु, संपूर्ण तटबंदी, यशवंत तिहेरी बुरुज, तिनही तलाव, मोठी विहीर, अफजल कबर, शिवाजी महाराज यांचा सध्याच्या पुतळा, गार्डन, वाहणतळ आदी सर्व बाबी सविस्तर पणे दाखविण्यात आल्या आहेत. हा किल्ला पाहता क्षणीच प्रत्यक्ष प्रतापगड किल्ल्याची सैर झाल्याचा अनुभव येत असल्याची प्रतिक्रिया गावकऱ्यांनी व्यक्त केली आहे. काल प्रथम सत्राच्या शेवटच्या दिवशी या किल्ल्याचे उद्घाटन अंभोरा पोलीस स्टेशन चे अधिकारी वर्ग, सरपंच, उपसरपंच, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सर्व सदस्य आणि सर्व पालक, ग्रामस्थ महिला भगिनी यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी संपूर्ण शिवचरित्र सादर केले, तसेच प्रतापगडावरील पराक्रम यावर आधारित पोवाडा आणि शिवचरित्रावरील गीते सादर केली. हा संपूर्ण कार्यक्रम आणि प्रतापगड किल्ल्याची उभारणी करण्यात मुख्याध्यापक अशोक शिंदे, शिवाजी खुडे, अण्णासाहेब घोडके, संतोष पवार, कविता सोनवणे, अनामिका शिंदे या शिक्षकांनी परिश्रम घेतले.

## रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा खरसई (मराठी) येथे आकाशकंदील बनवण्याची सर्जनशील कार्यशाळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**म्हसळा प्रतिनिधी — शिरीष समेळ**

म्हसळा : दिवाळी सणाचे आगमन होताच सर्वत्र सणासुदीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर म्हसळा तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा खरसई (मराठी) येथे दिनांक १४ ऑक्टोबर २०२५ रोजी "आकाशकंदील बनवा कार्यशाळा" हा उपक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. या उपक्रमाने विद्यार्थ्यांच्या मनामध्ये दिवाळीचा आनंद आणि सर्जनशीलतेची प्रेरणा दोन्हीही रुजवली.

या कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये कलात्मकता, स्वावलंबन आणि स्वतः काहीतरी नवीन निर्माण करण्याची प्रेरणा जागवणे हा होता. कार्यक्रमाचे आयोजन शाळेचे मुख्याध्यापक श्री. संदीप शेंबाळे सर, पदवीधर शिक्षक श्री. प्रमोद सिरसाठ सर, तसेच उपशिक्षिका श्रीमती जयश्री साळुंखे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आकाशकंदील तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया अगदी सोप्या आणि आनंददायी पद्धतीने समजावून सांगितली. कागदाची घडी घालणे, रंगांची सांगड लावणे, आकार देणे, चिकटवणे आणि अंतिम सजावट करणे या सर्व टप्प्यांचे प्रात्यक्षिक त्यांनी विद्यार्थ्यांना दाखवले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली



विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने सुंदर, रंगीबेरंगी आणि आकर्षक आकाशकंदील तयार केले.

कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांमध्ये अपार उत्साह पाहायला मिळाला. अनेक विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पकतेने पारंपरिक आणि आधुनिक डिझाइनचे मिश्रण असलेले आकाशकंदील तयार करून आपली सर्जनशीलता प्रकट केली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य, आनंद, टीमवर्क आणि आत्मविश्वास निर्माण झाला.

**मुख्याध्यापक श्री. संदीप शेंबाळे सर यांनी सांगितले की,**

"शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या हातातून सर्जनशीलतेचा विकास होणे गरजेचे आहे. अशा कार्यशाळा विद्यार्थ्यांना नवनिर्मितीची ओढ लावतात आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देतात."

या उपक्रमात शिक्षकवर्ग, शाळेतील सर्व विद्यार्थी तसेच पालक प्रतिनिधी यांची उपस्थिती होती. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनाबद्दल शाळेच्या शिक्षक व विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# सणसर येथे दुर्मिळ घुबाड जातीच्या पक्ष्याला ग्रामस्थानी दिले जीवदान

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

सणसर ता.इंदापूर येथे शुक्रवारी सकाळी ग्रामपंचायत समोरील बाजारतळात लिंबाच्या झाडावर पक्ष्यांच्या ओरडण्याचा वेगळाच आवाज सकाळी मॉर्निंग वॉकसाठी येणाऱ्या ग्रामस्थांच्या लक्षात आला आणि सहज त्या लिंबाच्या झाडावर त्यांची नजर गेली त्यावेळी तेथे दुर्मिळ जातीचे घुबाड पक्षी लिंबाच्या झाडावरती चायना नायलॉन मांज्याच्या दोऱ्याला अडकून आपला जीव वाचवत असल्याचे जाणवले त्यावेळी घुबाड पक्ष्याला दुसरे पक्षी त्याला चोच मारून घायाळ करण्याचा प्रयत्न करत होते. त्यावेळी शुक्रवारची सकाळची नमाज पठण करून सणसर भवानीनगर येथील प्रसिद्ध दोनचाकी गाड्या दुरुस्त करणारे बबन सय्यद फिटर यांनी त्याला



झाडावरुन सुखरुप खाली काढुन वाचवून जीवदान देऊन जखमी घुबाडाला सोडून देण्यात आले

घुबाड हा निसर्गातील अतिशय उपयुक्त पक्षी आहे. तो उंदीर, साप आणि इतर किड्यांवर नियंत्रण ठेवून शेतीचे मोठे नुकसान टाळतो.मात्र, समाजात घुबडाविषयी अनेक अंधश्रद्धा पसरलेल्या आहेत. काहींना वाटते घुबड दिसणे म्हणजे अपशकुन,तर काही ठिकाणी त्याचा मंत्र-तंत्रासाठी गैरवापर केला जातो.या चुकीच्या समजुतींमुळे हा निरुपद्रवी पक्षी अनेकदा त्रासाला आणि मृत्यूला सामोरा जातो.त्यामुळे घुबडाचे संरक्षण केले पाहिजे असे आवाहन प्राणी बचाव संस्थेच्या वतीने वारंवार प्रबोधन केले जात आहे.

त्यांना मदत करण्यासाठी दररोज सणसर गावातील मॉर्निंग वॉकसाठी येणारे गावातील इंदापूर मार्केट कमिटीचे संचालक संग्रामसिंह निंबाळकर विक्रम वाघ सोमनाथ निंबाळकर आत्माराम काळे सेवानिवृत्त कृषी अधिकारी कृष्णदास निंबाळकर एजाज सय्यद हुसेन भाई काझी इकबाल सय्यद राजेंद्र दळवी शामराव भाग्यवंत योगेश शेलार अमोल धोत्रे राजु धोत्रे यांनी त्या घुबाड जातीच्या पक्षाला वाचवण्यास मदत केली.आणि दुर्मिळ जातीच्या घुबाड पक्ष्याला जीवदान देण्यात आल्यामुळे मॉर्निंग वॉक टीमचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# मुदखेड नगर परिषद क्षेत्रातील महात्मा फुले चौकात पाईपलाईन फुटल्याने वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा

## नागरिक त्रस्त, प्रशासनाचे दुर्लक्ष

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी योगेश चौदंते मुदखेड**

मुदखेड शहरातील महात्मा फुले चौक येथे पाणीपुरवठा करणारी मुख्य पाईपलाईन फुटल्याने रस्त्यावरुन मोठ्या प्रमाणात पाणी रस्त्यावरुन वाहात आहे. पाणी या चौकातून दररोज मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत असल्याने या ठिकाणी पाणी रस्त्यावर साचते आहे. पाईपलाईन फुटून अनेक ठिकाणी पाणी साचत असून, नागरिकांना व पादचाऱ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. तरीही नगर परिषद प्रशासनाकडून या समस्येकडे कायम दुर्लक्ष केले जात आहे, अशी तीव्र नाराजी नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

महात्मा फुले चौक हा शहरातील मुख्य व सर्वाधिक वर्दळीचा मार्ग आहे. याच रस्त्यावरून जड वाहनांची वाहतूक सुरू असल्याने पाईपलाईनवरील ताण वाढून फुटी झाली आहे. दोन दिवसांपासून पाईप फुटीचे संकट निर्माण झाले असले तरी नगर पालिकेचे संबंधित विभाग वा कर्मचारी घटनास्थळी न येता जबाबदारी झटकताना दिसत आहेत. नागरिक म्हणतात, "शहरात एखादी समस्या उद्भवली की अधिकाऱ्यांचे फोन बंद आणि नगरसेवकांचे पत्ते गायब," अशी टीका नागरिक करत आहेत.

**निवडणुकीचा माहोल – पण नागरिकांचे प्रश्न कायम**

दरम्यान, आगामी नगर परिषद



निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध वार्डातील संभाव्य उमेदवार आणि प्रतिनिधी यांच्यात प्रचाराची लगबग सुरू झाली आहे. उमेदवारांच्या याद्या, राजकीय चर्चांना वेग आला असून, घराघरात राजकीय हालचालींना सुरुवात झाली आहे. परंतु शहराच्या मूलभूत सुविधांसाठी होणारी नागरिकांची गैरसोय मात्र दुर्लक्षित राहत असल्याची खंत नागरिक व्यक्त करत आहेत.

पाणीपुरवठा ही महत्त्वपूर्ण गरज असताना शहरात एक दिवस आड पाणीपुरवठा केला जातो. पावसाळा संपूनही नागरिकांना नियमित पाणी मिळत नाही. विविध भागांत जलपुरवठा अनियमित असून लोकांना एक दिवस आड करून पिण्याचे पाणी येत आहे. या गंभीर प्रश्नांवर कुठलाही नगरसेवक पुढाकार घेत नसल्याने प्रशासन व जनप्रतिनिधींविषयी संतापाची लाट उसळली आहे.

नागरिकांचा सवाल – "निवडणुकीत आश्वासनांची रेलचेल, पण काम शून्य!"

गेल्या अनेक निवडणुकांपासून नगर परिषदेत बदल झाले तरी कामकाज सुधारण्याऐवजी अधिकच बिघडले आहे.

– शहरात रस्त्यांची दुरवस्था
– ड्रेनेजच्या समस्या
– पाणीपुरवठा अनियमित
– कचरा व्यवस्थापन कच्चे
– गटारी तुंबल्याने अस्वच्छता आणि वीज पुरवठा खांबावरील वीज बंद आहे

या समस्या वर्षानुवर्षे सोडवण्याऐवजी कागदोपत्री योजना दाखवून नागरिकांची दिशाभूल होत असल्याची चर्चा सर्वत्र रंगली आहे.

**नागरिकांची मागणी**

१. महात्मा फुले चौकातील पाईपलाईन दुरुस्ती तात्काळ करावी
२. नविन पाइपलाइन करून द्यावी
३. अनियमित पाणीपुरवठ्याबाबत त्वरित उपाययोजना करावी
४. नगर परिषद प्रशासन जबाबदारीने काम करावे
५. निवडणूक काळातच नव्हे तर वर्षभर जनतेशी संपर्क ठेवावा नागरिकांना मूलभूत सुविधा देण्यात अपयशी ठरत असलेल्या मुदखेड नगर परिषदेवर लोकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. येणाऱ्या निवडणुकीत याचा परिणाम उमेदवारांना भोगावा लागू शकतो, अशी चर्चाही शहरात सुरू आहे.

## स्व.श्रीमती जानकीदेवी सानप सार्व. वाचनालय, सावरगाव येथे डॉ कलाम यांची जयंती "वाचन प्रेरणा दिन" उत्साहात साजरा...



**दैनिक युवक आधार**
**पाटोदा(प्रतिनिधी)**

स्व.श्रीमती जानकी देवी सानप सार्व. वाचनालय, सावरगाव घाट ता.पाटोदा, जि बीड येथे जगविख्यात शास्त्रज्ञ, भारताचे राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांची जयंती" वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरी करण्यात आली. या वेळी प्रमुख अतिथी म्हणून भगवान महाराज महाविद्यालय सावरगाव घाटचे प्राचार्य बी.टी.खाडे सर यांनी डॉ.कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी असंख्य वाचक व शालेय विद्यार्थी यांनी या प्रदर्शनात सहभाग घेतला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सावरगाव घाटचे माजी सरपंच पांडुरंग नाना खाडे हे होते. या वेळी प्रमुख अतिथी यांचे स्वागत ग्रंथालय कर्मचारी वाल्हेकर यांनी केले. या वेळी प्रमुख अतिथी प्राचार्य खाडे सर यांनी डॉ. कलाम यांच्या कार्याची माहिती सांगताना डॉ.कलाम यांनी आपले संपूर्ण आयुष्य देशासाठी समर्पित केले आंतरराष्ट्रीय स्तरावर तंत्रविज्ञाना साठी भारताचे नाव मोठे करून देशाच्या विकासासाठी फार मोठे योगदान दिले ते भारताचे आदर्श राष्ट्रपती व शास्त्रज्ञ होते त्यांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकार कडून त्यांना भारतरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. आज त्यांच्या विचारांचा, कार्याचा, देशावरील निष्ठेचा आदर्श युवकांनी घ्यावा असे म्हटले. या कार्यक्रमास ग्रंथालयाचे सचिव तथा महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे संचालक डॉ.राजेंद्र सानप, मा.ग्राम पंचायत सदस्य राजेंद्र खाडे, आशोक सानप, सुनील पाखरे, रमेश खाडे, भीमराव सानप, प्रशांत भोसले, ज्ञानेश्वर सानप, अनिकेत सानप, अक्षय शिंदे, यांच्या सह असंख्य वाचक, विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते.

# मासळी दुष्काळ घोषित करून मच्छिमारांना तातडीची आर्थिक मदत द्यावी – इम्तियाज कोकाटे यांची मागणी

**दैनिक युवक आधार श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी- अनिकेत मोहित**

कोकण किनारपट्टीवर यंदाच्या मासेमारी हंगामात समुद्राची साथ मिळाली नाही. बदलत्या हवामानामुळे आणि सततच्या वादळांमुळे मच्छिमारांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले असून "मासळी दुष्काळ" जाहीर करून मच्छिमारांना विशेष आर्थिक मदत देण्यात यावी, अशी ठाम मागणी इम्तियाज कोकाटे, चेअरमन, कोकण मच्छिमार सहकारी संस्था मर्या., श्रीवर्धन यांनी केली आहे.

कोकाटे यांनी सांगितले की, सन २०२५-२६ या हंगामात १ ऑगस्टपासून मासेमारीला सुरुवात झाली असली तरी, निसर्गाच्या अनियमित बदलामुळे मासेमारी अत्यंत अपुरी झाली आहे. बोटी चार-चार दिवस समुद्रात राहूनही मासळी मिळत नाही. डिझेल, बर्फ, बोटीवरील देखभाल, खलाशी व तांडेल यांचे मानधन अशा अनेक खर्चांनी मच्छिमार वर्ग आर्थिकदृष्ट्या कोलमडला आहे. याशिवाय अलीकडील "निसर्गशक्ती" वादळामुळे नौकांचे व उपकरणांचे नुकसान झाले असून अनेक मच्छिमारांकडे बिदागी देण्याइतपतही पैसा शिल्लक राहिलेला नाही.

कोकाटे पुढे म्हणाले, "शासनाने या परिस्थितीकडे गांभीर्याने पाहून 'मासाळी दुष्काळ' जाहीर करावा आणि मच्छिमारांना तातडीची आर्थिक मदत द्यावी. मत्स्यव्यवसाय विभागानेही या नुकसानाबाबत शासनाकडे विशेष शिफारस करावी, अशी आमची मागणी आहे."याचबरोबर कोकाटे यांनी श्रीवर्धनमध्ये मत्स्य विद्यापीठ स्थापन करण्याचीही गरज व्यक्त केली. त्यांनी सांगितले, "श्रीवर्धन हे समुद्रकिनाऱ्यावरील मच्छिमार व्यवसायावर आधारित प्रगत शहर असून येथे मत्स्य शिक्षणासाठी स्वतंत्र विद्यापीठ असणे अत्यावश्यक आहे.

त्यामुळे तरुण पिढीला मत्स्य विज्ञानातील उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळेल, तसेच स्थानिक रोजगार व संशोधन क्षेत्रात नवी दारे खुली होतील.

सध्या परदेशात किंवा इतर ठिकाणी जाऊन शिक्षण घेणे अनेक विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या अशक्य आहे. त्यामुळे श्रीवर्धन हे मत्स्य विद्यापीठासाठी आदर्श ठिकाण ठरेल."

कोकाटे यांच्या या मागणीला स्थानिक मच्छिमार व मत्स्य व्यवसायिकांनी पाठिंबा दर्शवला असून शासनाने या मागणीकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी सर्वत्र अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# राज्य उत्पादन शुल्क नागपूर विभागाची परराज्यातील अवैध मद्य विक्रेत्यांवर धडक कारवाई

## 41 लाख रुपये किमंतीचा विदेशी मुद्देमाल जप्त

**दैनिक युवक आधार प्रतिनिधी सतीश कडू संपादक नागपूर विभाग**



**नागपूर :** राज्य उत्पादन शुल्क आयुक्त, राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे, विभागीय उपआयुक्त गणेश पाटील, राज्य उत्पादन शुल्क, नागपूर राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक सुरजकुमार रामोड मार्गदर्शनाखाली 7 ऑक्टोबर रोजी निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, जी-विभाग, ई-विभाग व एच विभाग, नागपूर यांनी मध्यप्रदेश निर्मीत व विक्रीस असलेली व महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला एकुण 230 लिटर विदेशी मद्याचा मद्यसाठा व वाहन असा एकूण 16 लाख 13 हजार रुपये किमंतीचा मद्यसाठा जप्त केला.

13 ऑक्टोबर रोजी निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अ-विभाग, नागपूर यांनी मध्यप्रदेश, उत्तराखंड निर्मित स्कॉच महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला एकुण 17.11 लिटर स्कॉच मद्यसाठा व वाहन असा एकूण 18 लाख 99 हजार 80 रुपये किमंतीचा मद्यसाठा जप्त केला. तसेच 15 ऑक्टोबर रोजी निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, ई-विभाग वह-विभाग, नागपूर यांनी मध्यप्रदेश निर्मीत व विक्रीस असलेली व महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला एकूण 146.88 लिटर विदेशी मद्याचा साठा व वहन असा एकूण 6 लाख 5 हजार 824 रुपये किमंतीचा मद्यसाठा जप्त केला असा एकूण 41 लाख 18 हजार 108 रुपये किमंतीचा मध्यप्रदेश व अन्य राज्यात निर्मीत विदेशी मद्यसाठा जप्त करुन कारवाई केली.

या कार्यवाहीमध्ये 4 आरोपीना अटक करण्यात आलेली असून कारवाईमध्ये निरीक्षक शैलेश अजमिरे, विक्रम मोरे, मोहन पाटील, जयेंद्र जठार, आनंद पवार, मंगेश कावळे, दत्तात्रय लाडके, बालाजी चाळणेवार, जितेंद्र पवार, अनिल जूमडे, दुय्यम निरीक्षक व त्यांच्या संपूर्ण पथकाचा समावेश होता. ही कारवाई यापुढेही सुरु ठेवण्यात येणार आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून 2 ते 8 ऑक्टोबर या "दारुबंदी सप्ताह" च्या कालावधीमध्ये अवैध मद्य निर्मिती, विक्री, वाहतूक यांचेवर कारवाई करीता मोहिम राबविण्यात आलेली असून या कालावधीत एकूण 224 गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत. त्यामध्ये एकूण 168 आरोपींना अटक करण्यात आलेली असून एकूण 44 लाख 1 हजार 919 रुपये इतक्या किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सद्यस्थितीत राज्य उत्पादन शुल्क विभागाने दिवाळी व येणाऱ्या सण-उत्सवाच्या कालावधीत परराज्यातून अवैधपणे मद्याची आयात होण्याची शक्यता लक्षात घेता अशा मद्यावर कारवाईकरीता विशेष मोहिमेच आयोजन केले आहे. सध्या महाराष्ट्र राज्यातील विदेशी मद्याच्या किमतीत वाढ झालेली असून त्याकारणास्तव तुलनेने स्वस्त असलेले मद्य परराज्यातून अवैधपणे आयात होण्याची तसेच बनावट दारु निर्मिती करुन त्याची विक्री होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर मद्य हे विषारी व आरोग्यास हानीकारक असू शकते. अशा मद्याची आयात व विक्री करणे ही बाब महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ नुसार शिक्षा/दंडास पात्र असून अशा व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. नागरीकांनी महाराष्ट्र राज्यातील शासनाने प्रदान केलेल्या महा विक्री अनुज्ञप्तीधारकाकडूनच मद्य खरेदी करावे, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# म्हसळ्यात दुर्गंधीयुक्त दिवाळीला सुरूवात!

**दैनिक युवक आधार म्हसळा प्रतिनिधी**

**म्हसळा :** "स्वच्छ म्हसळा, सुंदर म्हसळा" या घोषवाक्याचा गजर नगर पंचायत प्रशासनाकडून दररोज घंटागाडीवरून ऐकायला मिळतो. परंतु वास्तव मात्र पूर्णपणे वेगळे आहे. ओला व सुका कचरा विलगीकरण केवळ कागदावरच होत असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. यंदाही दिवाळीच्या तोंडावर म्हसळा शहरात, विशेषतः म्हसळा कन्या शाळा परिसर, रोहीदास नगर,एकता नगर, मातोश्री पार्क,विनायक हौसिंग सोसायटी,सुनिता हाईट्स,निता रेसिडेन्सी गृहनिर्माण सोसायटी, धावीर मंदिर परीसर,सोनार आळी,तांबट आळी, ब्राम्हण आळी याभागात दुर्गंधीचा असह्य त्रास सुरू झाल्याने नागरिकांमध्ये



संताप व्यक्त केला जात आहे.

शहरातील विविध भागातून गोळा करण्यात येणारा ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे न साठवता दुर्गवाडी परीसरात एकाच ठिकाणी टाकला जात आहे. त्यावर योग्य प्रकारे प्रक्रिया न झाल्याने कचऱ्याचे ढीग कुजून दुर्गंधी पसरत आहे. सणासुदीच्या वातावरणात नागरिकांना ताजी हवा मिळण्याऐवजी नाकावर रुमाल धरावा लागण्याची वेळ आली आहे.

स्थानिक नागरिकांनी तक्रार करताना सांगितले की, "दरवर्षी ऑक्टोंबर महिन्यापासून संध्याकाळी दिवाबत्ती करण्याच्या वेळेपासून अतिशय दुर्गंधी सर्वत्र पसरते ही दुर्गंधीची तीव्रता इतकी असते की दारे , खिडक्या बंद केल्या तरीही घरभर ती पसरते त्यामुळे श्वास घेणे अवघड होते, जेवणाच्या ताटावर बसु नये असे वाटते . याबाबतीत अनेकवेळा अनेक निवेदने आणि तक्रार अर्ज करुन देखील त्यावर तात्पुरती मलमपट्टी केली जाते.कायम स्वरूपीं उपाययोजना केली जात नाही.प्रशासनाचे अधिकारी केवळ कचरा गाडीवरील टेपवर 'स्वच्छ म्हसळा, सुंदर म्हसळा' हे गाणं वाजवतात, पण प्रत्यक्षात कचरा व्यवस्थापनात काहीच सुधारणा होत नाही."

या परिसरातील शाळकरी मुलांना,गरोदर माता, स्तनपान करणाऱ्या माता, ज्येष्ठ नागरिक, तसेच सर्वसामान्य नागरिकांना या दुर्गंधीचा त्रास होत असून त्यांच्या आरोग्याच्या समस्या निर्माण झालेल्या आहेत. कचरा व्यवस्थापनासाठी नगर पंचायतने यंत्रणा उभारली नसल्याने केवळ थोड्याच दिवसात काम सुरू होईल अशा भुलथापा सातत्याने दिल्या जातात प्रत्यक्षात कोणत्याही प्रकारची व्यवस्था राबवली जात नाही.

प्रशासनाने तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. अन्यथा या परीसरात राहणा-या लोकांच्या आनंदाची दिवाळी "दुर्गंधीयुक्त दिवाळी" होईल आणि त्याचा परिणाम ऐन दिवाळीच्या सणात नगरपालिकेवर संक्रांत येईल आणि नागरिकांचा मोर्चा नगरपालिकेवर धडकेल.

# श्री गुरु तेग बहादुर यांच्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त ७ डिसेंबर रोजी नागपुरात विदर्भस्तरीय कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार प्रतिनिधी ज्योत्सना करवाडे विदर्भ प्रमुख**

नागपूर, दि. 16 - श्री गुरु तेग बहादुर यांचे सन-२०२५ हे ३५० वे शहीदी समागम शताब्दी वर्ष असल्याने त्यांचा गौरवशाली इतिहास सर्वांना माहीत व्हावा तसेच याचे स्मरण होण्याकरीता विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याकरीता हिंद-की-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिब जी ३५० वी शहीदी समागम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. विदर्भस्तरीय हा कार्यक्रम ७ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात येणार आहे. जिल्हा प्रशासन आणि या कार्यक्रमासाठीच्या क्षेत्रीय समित्यांनी परस्पर समन्वयातून हा कार्यक्रम यशस्वी करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी आज येथे केले.

सदर येथील जिल्हा नियोजन भवन येथे आज प्राथमिक आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी रामेश्वर नाईक, निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे, समितीचे अध्यक्ष गुरमीत सिंग खोखर, उपाध्यक्ष वीरेंद्र कुकरेजा आदी उपस्थित होते.

**जिल्हा प्रशासन आणि क्षेत्रीय समितीच्या समन्वयातून आयोजन यशस्वी करूया-- जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर**

विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे तसेच कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता, समन्वय समिती, क्षेत्रीय आयोजन समिती व विविध कार्यक्रम आयोजन व्यवस्था समित्या स्थापन करण्यात येणार आहे. नांदेड, नागपूर आणि नवी मुंबई येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे, नागपुरात होणाऱ्या कार्यक्रमात विदर्भातील सर्व जिल्हे समाविष्ट करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी यावेळी म्हणाले.



**श्री परमेश्वर महादेव घुले या व्यक्तीचा शाळेचा दाखला दिनांक 13 /09 /2025 रोजीआष्टी ते अहिल्यानगर प्रवास करत असताना सकाळी 10.25 वाजता हरवला आहे.जय भवानी विद्यालय जळगाव ता. आष्टी जि.बीड या शाळेचा विद्यार्थी आहे.2001साली इयत्ता 10 वी चा आहेश्री परमेश्वर महादेव घुले मु.पो.केळसांगवी ता.आष्टी जि.बीड पिन कोड 414208 मो.9518922883 मिळाल्यास संपर्क साधावा**

# गणेश बोरकर यांची वं.ब.आ.ता. उपाध्यक्षपदी निवड...

## वंचित बहुजन आघाडी पक्षात शेकडो कार्यकर्त्यांचा प्रवेश

**किनवट प्रतिनिधी विशेष विशाल भालेराव**

14 ऑक्टोंबर रोजी धम्मचक्र परिवर्तन दिनाचे औचित्य साधत वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष निखिल वाघमारे व किनवट तालुका कार्यकारणीच्या वतीने किनवट मध्ये भव्य जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत उत्तरचे जिल्हा अध्यक्ष डॉ.राजेश्वर हत्ती आंबिरे पालमकर यांच्या उपस्थितीत तालुका अध्यक्ष निखिल वाघमारे यांच्या हस्ते आदिवासी समाजाचे नेते गणेश बोरकर यांना नियुक्तीपत्र देऊन



किनवट तालुका वंचित बहुजन आघाडीच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली त्यामुळे शेकडो एससी, एसटी, ओबीसी, महिला, पुरुष तरुण युवा यांनी वंचित बहुजन आघाडी मध्ये जाहीर प्रवेश केला. यामुळे स्थानिक स्वराज्य च्या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचे ताकद वाढल्याचे दिसून येत आहे. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून सुरेश जाधव जिल्हा उपाध्यक्ष वं.बं.आ. दिलीप केरबाजी ता. अध्यक्ष वं.ब.आ. भोकर, हिदायत खान पठाण वं. ब.आ.ता.अध्यक्ष हदगाव,प्रवीण दादा गायकवाड,अमर हत्ती आंबिरे, माधव कावळे ज्येष्ठ नेते,शाहीर कैलास दादा राऊत, दत्ता गडलवाड दादा ज्येष्ठ नेते, विलास भालेराव, देविदास भालेराव, शेळके,गौरव कदम, जगदीप हानवते, इत्यादी मान्यवर उपस्थित होते व कार्यक्रमास इतर पदाधिकारी महिला व शेकडो युवा कार्यकर्ते उपस्थित होते

# रेवदंडा-चौलमध्ये बालमावळ्यांची दिवाळी किल्ल्यांच्या जयघोषात उजळली!

**दैनिक युवक आधार निलेश फुंडे रेवदंडा**

रेवदंडा–चौल परिसरातील बालमावळ्यांमध्ये सध्या दिवाळीचा उत्साह आणि "जय भवानी! जय शिवाजी!" "छत्रपती शिवाजी महाराज की जय!" चा गजर दोन्ही रंगले आहेत. हिरव्यागार कोकणात, नारळाच्या झाडांच्या सान्निध्यात आणि समुद्राच्या झुळुकीत ही लहान मावळे मंडळी मातीतून 'स्वराज्य' उभं करत आहेत. कोणतंही औपचारिक प्रशिक्षण नाही, तरी ही मुले एखाद्या अभियंत्याप्रमाणे काम करतात. विटा, माती, धान्याची पोती, प्लास्टिकच्या बाटल्या, लाकडी फळ्या या सगळ्या कच्च्या मालापासून बालमावळे रायगड, प्रतापगड, तोरणा, कुलाबा, सिंधुदुर्ग, जंजिरा असे डोंगरदऱ्यांतील किल्ले साकारत आहेत.सकाळ झाली की ऊन असो वा



पाऊस किल्ला उभारणं हेच त्यांचं ध्येय. सगळ्यात सुंदर, सगळ्यात देखणा किल्ला आपलाच असावा, यासाठी सारे सवंगडी मेहनतीने झटत आहेत.

किल्ला पूर्ण झाला की त्यावर छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती, मावळे, दरवाजे, मंदिर, तोफा आणि वाघ-घोड्यांची आकर्षक मांडणी केली जाते.

त्या वेळी साऱ्या गल्लीत एकच नाद घुमतो "जय भवानी! जय शिवाजी!" दिवाळी म्हटलं की नवीन कपडे, फराळ, फटाके यांच्याबरोबर किल्ला बनवणं हा कोकणातील लहानग्यांचा आवडता सोहळा आहे.या बालमावळ्यांच्या चेहऱ्यावरती उत्साह, किल्ल्यांवरती मातीतलं प्रेम आणि हृदयात महाराजांप्रती प्रचंड आदर — हे दृश्य पाहून प्रत्येकालाच अभिमान वाटतो.

बाजारात तयार रंगीत किल्ले आणि मूर्तींची रेलचेल असली तरी रेवदंडा-चौलच्या बालगोपाळांना तयार किल्ले नकोत — त्यांना आपल्याच हाताने घाम गाळून बनवलेला 'स्वराज्याचा किल्ला'च हवा आहे!कोकणातील या बालमावळ्यांच्या हातांनी उभं राहिलेलं हे 'मातीतलं स्वराज्य' म्हणजे दिवाळीच्या आनंदात भरणारा सर्वात सुंदर रंग!

जय भवानी! जय शिवाजी! जय कोकण!

# उपसरपंच आकाश नडपेलवार यांची (शिवसेना) कामगार सेनेच्या तालुकाप्रमुख पदी निवड

**दैनिक युवक आधार - घाटंजी तालुका प्रतिनिधि महेश पेन्दोर**

यवतमाळ येथे आज महाराष्ट्र राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तसेच यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार संजयभाऊ राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना (शिंदे गट) तर्फे आयोजित घाटंजी तालुक्यातील विविध आघाड्यांच्या पदाधिकाऱ्यांचा भव्य पदनियुक्ती सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला.

या सोहळ्यात घाटंजी तालुक्यातील अनेक कार्यकर्त्यांना पक्ष संघटन बळकट करण्यासाठी महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपवण्यात



आल्या. विशेष म्हणजे, चिखलवर्धा ग्रामपंचायतीचे उपसरपंच आकाश नडपेलवार यांची घाटंजी तालुकाप्रमुख – कामगार सेना म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या या निवडीमुळे तालुक्यातील कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, आकाश नडपेलवार यांच्या नेतृत्वाखाली कामगार सेनेला नवचैतन्य लाभेल, असा विश्वास शिवसैनिकांनी व्यक्त केला आहे.

या कार्यक्रमाला पश्चिम विदर्भाचे समन्वयक परागभाऊ पिंगळे, संपर्कप्रमुख हरिहरभाऊ लिंगणवार, संपर्कप्रमुख श्रीधर (काका) मोहोळ, जिल्हा प्रमुख राजूदास जाधव, गजानन डोमाळे, यशवंत पवार, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख दर्शना ताई इंगोले, वैशालीताई मासाळ, ज्योतीताई वाघाडे, युवासेना लोकसभा अध्यक्ष विशाल गणात्रा, युवासेना जिल्हाप्रमुख आकाश राठोड, विधानसभा प्रमुख सतीश डफळे पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख निलेश चव्हाण, शहर प्रमुख सागर पवार यांच्यासह विविध आघाड्यांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमात मंत्री संजयभाऊ राठोड यांनी नव्या पदाधिकाऱ्यांना संघटन बळकट करण्याचे आणि पक्षविस्तारासाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. "शिवसेनेचा प्रत्येक सैनिक हा जनतेच्या सेवेसाठी कटिबद्ध आहे," असे त्यांनी सांगितले.

पदनियुक्ती सोहळा दरम्यान "एकनाथ शिंदे जिंदाबाद, संजयभाऊ राठोड आगे बढ़ो, हम तुम्हारे साथ हैं!" अशा घोषणांनी संपूर्ण वातावरण दुमदुमून गेले. आकाश नडपेलवार यांच्या नियुक्तीमुळे कामगार सेनेच्या संघटनात नवी उर्जा व दिशा प्राप्त झाली असून, येत्या काळात शिवसेनेचा प्रभाव तालुक्यात आणखी वाढेल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

# शनिवारी खारघरमध्ये 'दिवाळी संध्या'

**दैनिक युवक आधार पनवेल(प्रतिनिधी)**

सुश्राव्य गाण्यांची सुरेल मैफिल असलेल्या 'दिवाळी संध्या' या सांस्कृतिक मेजवानीचे दरवर्षीप्रमाणे यंदाही लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले असून खारघर भाजपच्यावतीने शनिवार दिनांक १८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता खारघर मधील गावदेवी मैदानावर 'दिवाळी संध्या' हा संगीतमय कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात राधा हि बावरी फेम सुप्रसिद्ध गायक स्वप्निल बांदोडकर, गायक



के. शिरीष, गायिका गुल सक्सेना आणि सपना हेमन या प्रसिद्ध गायकांचे गायन सादरीकरण होणार आहे. . भाजपतर्फे दरवर्षीप्रमाणे दिवाळी सणाच्या निमित्ताने संगीत, संस्कृती आणि कलेचा संगम साधणारी ही 'दिवाळी संध्या' रसिकांसाठी खऱ्या अर्थाने सांस्कृतिक मेजवानी ठरणार आहे. या कार्यक्रमांमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संगीत आनंद घ्यावा, असे आवाहन भाजपचे खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# सातारा, कोल्हापूर, बीड, धाराशिव, लातूर, परभणी, नांदेड या पूरग्रस्त जिल्ह्यांसाठी १३५६ कोटीचा मदत-मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, संतोष पाटील**

सप्टेंबर 2025 मध्ये झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित झालेल्या सातारा, कोल्हापूर, बीड, धाराशिव, लातूर, परभणी आणि नांदेड जिल्ह्यातील २१ लाख ६६ हजार १९८ शेतकऱ्यांच्या १५ लाख १६ हजार ६८१.२१ हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी १३५६ कोटी ३० लाख २२ हजार रुपयांची मदत वितरित करण्यास मान्यता देण्यात आल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली. या बाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला.

सातारा जिल्ह्यातील ११ हजार ११३ शेतकऱ्यांच्या चार हजार २१९.२८ हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी सहा कोटी २९ लाख तीन हजार रुपये

कोल्हापूर जिल्ह्यातील पाच हजार ८६० शेतकऱ्यांच्या एक हजार ६९६.३६ हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी तीन कोटी १८ लाख रुपये बीड आठ लाख सहा हजार ५१३ शेतकऱ्यांच्या सहा लाख ४४ हजार ९१८.५५ हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी ५७७ कोटी ७८ लाख ९२ हजार रुपये.धाराशिव : चार लाख चार हजार ६५६ शेतकऱ्यांच्या तीन लाख ११ हजार २९१.२३ हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी २९२ कोटी ४९ लाख २२ हजार रुपये.लातूर : चार लाख १५ हजार ४९२ शेतकऱ्यांच्या २३ लाख सहा हजार ६२८.९९ हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी २०२ कोटी ३८ लाख १९ हजार रुपये परभणी : चार लाख ३९ हजार २९७ शेतकऱ्यांच्या दोन लाख ८५ हजार ८५३.७८ हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी २४५ कोटी ६४ लाख ४९ हजार नांदेड : ८३ हजार २६७ शेतकऱ्यांच्या ३२ हजार ७३.०२ हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी २८ कोटी ५२ लाख ३७ हजार रुपये.मंत्री मकरंद पाटील यांनी सांगितले, नैसर्गिकआपत्तीत मृत झालेल्या व्यक्तींच्या वारसांना तसेच पशुधनाचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आणि घरांची पडझड झालेल्या नागरिकांना मदत थेट जिल्हास्तरावरूनच दिली जाणार आहे. त्यामुळे शासनस्तरावर प्रस्ताव पाठविण्याची आवश्यकता राहणार नाही त्यांना मदत त्वरित व कार्यक्षम पद्धतीने वितरीत होईल.

## खारघर-तळोजा परिसरातील गृहसंकुलांच्या समस्यांवर आ. प्रशांत ठाकूर आणि सहव्यवस्थापकीय संचालक शांतनू गोयल यांच्या उपस्थितीत सकारात्मक चर्चा



**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

खारघर व तळोजा क्षेत्रातील सिडकोनिर्मित गृहनिर्माण संकुल असलेल्या आसावरी, बागेश्री, केदार, मारवा, धनश्री व इतर गृहसंकुलांतील पदाधिकारी व रहिवाशांनी त्यांच्या विविध समस्यांच्या निवारणासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आज सिडकोच्या कार्यालयात सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक शांतनू गोयल यांच्यासोबत बैठक झाली. या बैठकीच्या अनुषंगाने या गृहनिर्माण सोसायटींचे रजिस्ट्रेशन, सुरक्षा, पाणी, स्वच्छता, वीज या समस्या सोडविण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. या बैठकीला नितीन भोईर, खांडू खटरमल, संदीप वेथेकर, नवनाथ भोजने व इतर सोसायटीचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी या सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी सिडकोतर्फे एका वरिष्ठ अधिकाऱ्याची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करून त्या अंतर्गत अभियांत्रिकी इस्टेट, पाणी व अन्य अधिकारी यांची कमिटी करून त्यांनी पंधरा दिवसाच्या आत या सर्व सोसायटीमध्ये जाऊन प्रत्यक्षात निरीक्षण करून सकारात्मक तोडगा काढण्यासंर्दभात तातडीने कार्यवाही करण्याची सूचना आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली. ती सूचना तातडीने मान्य करून सहव्यवस्थापकीय संचालक शांतनू गोयल यांनी कार्यवाही करण्याचे मान्य केले व संकुलातील रहिवाशांचे समस्यांचे निवारण करण्यात येईल असे आश्वासित केले. रजिस्ट्रेशनच्या बाबतीत सोसायटीने कागदपत्रांची पूर्तता केल्यास त्यावर तातडीने कार्यवाही करण्याचेही त्यांनी मान्य केले. या फलदायी बैठकीमुळे खारघर व तळोजा परिसरातील सिडकोनिर्मित गृहसंकुलांतील रहिवाशांना मोठा दिलासा मिळाला असून, त्यांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या समस्यांच्या निवारणाचा मार्ग मोकळा झाला आहे.

# सी आर एस पोर्टल बंद चा फटका लहान बाळांना! न्याय मिळणार का?

### बाळाचे नोंदीचा दाखला कधी मिळणार?, आईची आर्त हाक.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटिल**

**रिसोड-** तालुक्यातील रिठद गावच्या अनेक माता–पित्याचा आपल्या बाळाच्या जन्माच्या नोंदीचा प्रश्न त्यांना सतत बारा ते तेरा महिन्यांपासून भेडसावत असून जिल्हा परिषद आरोग्य विभागाने याबाबत सीआरएस पोर्टल चालू करण्यासंबंधी अद्यापही कोणतेही हालचाल केली नसल्याचे दिसते. आपल्या पाल्याला कोणतेही भविष्य नसल्याचे आई-वडिलांना दिसत आहे. रिसोड तालुक्यातील अनेक मोठी गावे या सीआरएस पोर्टलमुळे त्रस्त झाली असून जन्माचे नोंदणी प्रमाणपत्र मिळवण्यासाठी सीआरएस पोर्टलच्या माध्यमातून जन्माचा दाखला मिळतो. परंतु हे पोर्टल बंद असल्याने अनेक पालक व माता-पिता त्रस्त झाल्याने आपल्या मुलाचे भवितव्य अंधाराकडे जाताना त्यांना दिसत आहे. सध्याच्या आधुनिक युगात संगणक असल्याने प्रत्येकाला जन्माचा दाखला ऑनलाईन घेतल्याशिवाय आधार कार्ड निघत नाही. त्यामुळे राशन कार्ड काढायचे असल्यास व त्यामध्ये मुलाची नावे आधार कार्ड शिवाय टाकता येत नाही. आज एक वर्ष झालं परंतु त्याचा फटका जन्माला आलेल्या बालकाला बसत आहे. नोंदणी करण्यासाठी सीआरएस पोर्टल बंद आहे. परंतु अशा जन्माच्या असो किंवा मृत्यूच्या कोणत्याही नोंदी करण्यासाठी तीन महिन्याच्या आत कराव्या लागतात. व त्यानंतर कोर्टाच्या चकरा मारून पैसे खर्च करून त्यांच्याकडून जन्माची नोंद करण्यासाठी वेळ जातो. वकिलासाठी पैसे खर्च करावे लागतात. अशा किचकट व्यवस्थेतून प्रत्येक पालकाला जावे लागते. सीआरएस पोर्टल बंदचा फटका पालकांना बसत आहे परंतु आरोग्य विभाग



याबाबत कोणतेही दखल घेताना दिसत नाही. त्यामुळेच अनेक पालक त्रस्त झाले आहेत. या बाबा जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, आणि जिल्हाधिकारी यांनी संयुक्त निर्णय घेऊन सी आर एस पोर्टल सुरू करण्यासंबंधी संबंधित विभागाकडे पाठपुरावा करावा तरच पालकाचे समाधान होईल व त्यामधून सीआरएस पोर्टलच्या माध्यमातून ज्या नोंदी झाल्या नाहीत त्याही नोंदी होण्यास सुरुवात होईल. याबाबत प्रशासनाने लक्ष घालावे अशी मागणी अनेक मात्या–पित्याकडून होत आहे. त्याचेच एक उदाहरण तिथे अथर्व रितेश विधाते या मुलाचा जन्म रिठद येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये दिनांक 2 नोव्हेंबर 2024 रोजी झाला असून त्याला अद्यापही जन्माचा दाखला मिळाला नाही. सी आर एस पोर्टल बंद मुळे ह्या बालकाला आपल्या जन्माची नोंद करण्यास पासून वंचित राहावे लागले. त्यामुळे न्याय मागायचा कोणीतरी कुणाकडे?, अशा त्रस्त माता पैकी लक्ष्मी रितेश विधाते यांनी केला आहे.

# मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये नवी मुंबईतील पहिल्या ट्रॉमा सेंटरला सुरूवात

### गोल्डन अवरमध्ये मिळणार उपचार -आघातग्रस्त रुग्णांमधील मृत्युदराचे प्रमाण होणार कमी

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई:प्रतिनिधी**



अपघात झाला की सर्वप्रथम अपघातग्रस्तांना गरज असते ती तातडीच्या सर्वोत्कृष्ट वैद्यकीय उपचारांची. त्यामुळे अपघातानंतरचा एक तास म्हणजेच गोल्डन अवर खुप मोलाचा ठरतो. या काळात वेळीच उपचार मिळाल्यास अपघातग्रस्ताचे प्राण वाचतात. *नवी मुंबईतील खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलने शहरातील पहिले आणि सुसज्ज असे प्रगत ट्रॉमा सेंटर सुरू केले आहे.*

ट्रामा केअर युनिटमध्ये सगळ्या प्रकारच्या अपघातांवर एकाच छताखाली सर्व उपचार उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. या युनिटमध्ये न्यूरोसर्जन, इंटेन्सिव्हिस्ट, जनरल सर्जन, ऑर्थोपेडिक सर्जन, ऍनेस्थेसिस्ट, कुशल परिचारिका यांचा समावेश असणार आहे. तसेच ऑपरेशन थिएटर आणि अतिदक्षता विभागात सर्व प्रकारची अत्याधुनिक उपकरणे, सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. या सेंटरच्या शुभारंभ प्रसंगी आपत्कालीन यंत्रणेसाठी लागणारी साधनसामग्री येथे उपलब्ध असून रुग्ण दाखल झाल्यापासून त्याची प्रकृती स्थिर होईपर्यंतची सगळी काळजी या युनिटमध्ये घेतली जाते.

मेडिकव्हर हॉस्पिटलने सीपीआर प्रशिक्षण आणि मेडिकव्हर लाईफ सेव्हर प्रोग्राम देखील सुरू केला आहे जेणेकरून गंभीररित्या जखमी रुग्णांना मदत करण्यासाठी नागरिकांनाही सक्षम केले जाईल.मेडिकव्हर हॉस्पिटलने रुग्ण-केंद्रित आरोग्यसेवा प्रदान करण्यासाठी प्रगत ट्रॉमा सेंटर सुरू करत एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. या कार्यक्रमात रुग्ण, रुग्णवाहिका चालक, सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक रहिवासी आणि आरटीओ अधिकाऱ्यांसह १०० हून अधिक व्यक्तींनी सहभागी झाल्या होत्या.

मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे कॉम्प्लेक्स ट्रॉमा, पेडियाट्रिक ऑर्थोपेडिक्स आणि इलिझारोव्ह सर्जन डॉ. नितीश अरोरा सांगतात की ,* अपघातग्रस्तांना तातडीच्या वैद्यकिय उपचारांची गरज असते. आघातग्रस्त रुग्णांमधील मृत्युदराचे प्रमाण देखील जास्त आहे. अपघातानंतर पहिल्या एक तासात म्हणजेच "गोल्डन अवर" मध्ये वैद्यकीय मदत दिली पाहिजे. *आपत्कालीन परिस्थितीत ८६५५८४५८६१* या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन मेडिकव्हर हॉस्पिटलच्या वतीने करण्यात आले आहे.विशेष आपत्कालीन टीम आणि ट्रॉमा केअरसाठी समग्र दृष्टिकोनासह, नव्याने सुरू केलेले ॲडव्हान्स्ड ट्रॉमा सेंटर नवी मुंबईकरांसाठी एक जीवनरक्षक केंद्र ठरणार *असल्याचे वक्तव्य मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे महाराष्ट्र आणि कर्नाटक प्रदेशाचे प्रादेशिक संचालक नीरज लाल यांनी केले.* अपघातग्रस्त विकास गुप्ता यांनी* त्याच्यावरील आपत्कालीन प्रसंगाविषयी बोलाताना सांगितले की, मला आयुष्यात दुसरी संधी दिल्याबद्दल मी मेडिकव्हर हॉस्पिटलमधील डॉक्टरांचा कायम आभारी राहीन. प्रत्येक सेकंद महत्त्वाचा असताना ट्रॉमा सेंटरने प्रसंगावधान राखत त्वरीत उपचार केले. माझ्याप्रमाणेच, इतर अपघातग्रस्त रुग्णांना गोल्डन अवरमध्ये उपचार मिळावेत यासाठी मेडिकव्हर हॉस्पीटल सज्ज झाले आहे.

## दीपावलीच्या आनंद सोहळ्यात मंगळवारी सुप्रसिद्ध गायिका बेला शेंडे यांच्या सुरेल मैफिलीचा जल्लोष

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

पनवेल महानगरपालिका आयोजित व श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ प्रायोजित सुश्राव्य गाण्यांची सुरेल मैफिल असलेल्या 'दिवाळी पहाट' चे आयोजन पनवेलमध्ये करण्यात आले आहे. मंगळवार दिनांक २१ ऑक्टोबर रोजी सकाळी ५. ३० वाजता पनवेल शहरातील वडाळे तलाव येथे हा कार्यक्रम होणार आहे. यंदाचे हे ९ वे वर्ष असून या कार्यक्रमात सुप्रसिद्ध व लोकप्रिय गायिका बेला शेंडे आपल्या सुमधुर आवाजात सुश्राव्य गीतांची मैफल सादर करणार आहेत. त्यामुळे दीपावलीच्या आनंददायी वातावरणात बेला शेंडे यांच्या सुरेल स्वरांचा जल्लोष अनुभवण्याची संधी पनवेलकरांना लाभणार आहे.

या कार्यक्रमासाठी प्रवेश निःशुल्क असून श्री रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळ



कार्यालय, मार्केट यार्ड पनवेल, आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह पनवेल, अमोल स्टेशनरी, टिळक रोड पनवेल येथे मोफत प्रवेशिका उपलब्ध करण्यात आल्या आहेत. अधिक माहितीसाठी अभिषेक पटवर्धन ८६६८३३२१५९, गणेश जगताप ९८७०११६९६४, वैभव बुवा ९०२९४१०६९९, किंवा आदित्य उपाध्ये ९३२४६०३४७३ या क्रमांकावर संपर्क साधावा तसेच या सुरेल मैफलीचा संगीत रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## उपसरपंच आकाश नडपेलवार यांची (शिवसेना) कामगार सेनेच्या तालुकाप्रमुख पदी निवड

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधि.**
**महेश पेन्दोर**

यवतमाळ येथे आज महाराष्ट्र राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तसेच यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार संजयभाऊ राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना (शिंदे गट) तर्फे आयोजित घाटंजी तालुक्यातील विविध आघाड्यांच्या पदाधिकाऱ्यांचा भव्य पदनियुक्ती सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला.



या सोहळ्यात घाटंजी तालुक्यातील अनेक कार्यकर्त्यांना पक्ष संघटन बळकट करण्यासाठी महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या. विशेष म्हणजे, चिखलवर्धा ग्रामपंचायतीचे उपसरपंच आकाश नडपेलवार यांची घाटंजी तालुकाप्रमुख – कामगार सेना म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या या निवडीमुळे तालुक्यातील कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, आकाश नडपेलवार यांच्या नेतृत्वाखाली कामगार सेनेला नवचैतन्य लाभेल, असा विश्वास शिवसैनिकांनी व्यक्त केला आहे.

या कार्यक्रमाला पश्चिम विदर्भाचे समन्वयक परागभाऊ पिंगळे, संपर्कप्रमुख हरिहरभाऊ लिंगणवार, संपर्कप्रमुख श्रीधर (काका) मोहोळ, जिल्हा प्रमुख राजूदास जाधव, गजानन डोमाळे, यशवंत पवार, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख दर्शना ताई इंगोले, वैशालीताई मासाळ, ज्योतीताई वाघाडे, युवासेना लोकसभा अध्यक्ष विशाल गणात्रा, युवासेना जिल्हाप्रमुख आकाश राठोड, विधानसभा प्रमुख सतीश डफळे पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख निलेश चव्हाण, शहर प्रमुख सागर पवार यांच्यासह विविध आघाड्यांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात मंत्री संजयभाऊ राठोड यांनी नव्या पदाधिकाऱ्यांना संघटन बळकट करण्याचे आणि पक्षविस्तारासाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. "शिवसेनेचा प्रत्येक सैनिक हा जनतेच्या सेवेसाठी कटिबद्ध आहे," असे त्यांनी सांगितले.

पदनियुक्ती सोहळा दरम्यान "एकनाथ शिंदे जिंदाबाद, संजयभाऊ राठोड आगे बढ़ो, हम तुम्हारे साथ हैं!" अशा घोषणांनी संपूर्ण वातावरण दुमदुमून गेले.

आकाश नडपेलवार यांच्या नियुक्तीमुळे कामगार सेनेच्या संघटनात नवी उर्जा व दिशा प्राप्त झाली असून, येत्या काळात शिवसेनेचा प्रभाव तालुक्यात आणखी वाढेल,

असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

## "दीपोत्सव २०२५" हा दिवाळीचा आनंददायी कार्यक्रम उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी**

हुजूरपागा गर्ल्स इंग्लिश मिडियम स्कूल, मांगडेवाडी, कात्रज येथे दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ रोजी "दीपोत्सव २०२५" हा दिवाळीचा आनंददायी कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. यंदा संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांचे २०२५ हे ७५० वे जयंती वर्ष म्हणून साजरे करण्यात येत आहे, त्यानिमित्ताने हा दीपोत्सव श्री ज्ञानेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन करून आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात सर्जनशीलता, संस्कृती आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम दिसून आला. यानिमित्ताने ज्ञानेश्वरांच्या विविध अभंगांचे विद्यार्थिनींनी गायन केले.याशिवाय मी आणि आई- सॉलिड टीम या उपक्रमातून तोरण बनवणे,वडील-



मुलगी यांच्यासाठी किल्ला बनविणे, विद्यार्थिनीसाठी पोस्टर बनवणे अशा विविध स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले, ज्यामुळे कौटुंबिक नाती अधिक दृढ झाली. तसेच शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी रांगोळी स्पर्धा घेण्यात आली."देणे समाजाचे" या सामाजिक उपक्रमांतर्गत स्नेहालय फाउंडेशनसाठी धान्यसंकलन मोहीम आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांनी व पालकांनी साखर, गहू, तांदूळ अशा वस्तूंचे दान करून दिवाळीचा खरा संदेश — "आनंद वाटण्यातच खरा सण" — प्रत्यक्षात उतरवला.संस्थेतील लेखनिक श्रीमती आसावरी गोरे यांनी पसायदान सुंदर आवाजात सादर करून वातावरण प्रसन्न केले. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसायटी च्या अध्यक्ष श्रीमती शालिनीताई पाटील ,सचिव श्रीमती रेखा पळशीकर सहसचिव श्रीमती डॉ.अरुणा भामरे, सभासद श्रीमती अरुणा तिवारी ,सभासद श्री लक्ष्मीकांत मुंदडा, सभासद श्रीमती अलका काळे, विश्वस्त श्री दुष्यंत घाटगे , माजी विश्वस्त श्री का. बा .पारखी व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# पुरा जिल्हा परिषद शाळा भरते सभागृहामध्ये शासनाची उदासीनता



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी**

जिल्हा परिषद शाळा पुरा ( साईनगर ) पाथरी तालुक्यापासून अगदी हाकेच्या अंतरावर असणारी ही शाळा आजही भरती समाजाच्या सहगृहामध्ये शाळेचे आवारात मोठ्या प्रमाणात शाळेच्या मागील खाणीचे पाणी येत असून शाळेत जाण्यासाठी आणि येण्यासाठी तेथील मार्ग पाण्यामुळे पूर्ण बंद आहे वेळोवेळी शासनाकडे पाठपुरावा करूनही एस डी एम कार्यालय पाथरी यांना निवेदन देऊ नये कुठल्याही प्रकारचं शासनाने यावं आतापर्यंत पावले उचललेले नाहीत.

भारतेकडे महासत्ता होण्याची स्वप्न बघत असताना दुसरीकडे मूलभूत सुविधा पासूनही आपण आज ही वंचित आहोत का हा प्रश्न विचारला लागेल.

या शाळेमध्ये एकूण 45 विद्यार्थी शिकतात. इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंत ही शाळा आहे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 548 ब या महामार्गाला लागून ही शाळा आहे तरी शासन या शाळेकड पूर्णता दुर्लक्ष करत आहे.

जर येथील विद्यार्थी सुरक्षित नसेल त्यांच्या भौतिक सुविधा साठी शासनाला वेळ नसेल, तर आपण महासत्ता होण्याची स्वप्न बघणे ही चुकीचे ठरेल.

आता तरी शासन या शाळेकडील बघून या शाळेच्या भौतिक शब्दकडे लक्ष देईल का हा प्रश्न उद्भवत आहे.

ही शाळा सध्या साईनगर पुरा या सभागृहात भरत आहे सभागृहात शाळा चालू असताना विद्यार्थ्यांचा एका जागेवर सर्वच विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास कसा होईल शिक्षकांसमोर हाही प्रश्न आहे.

शासनाची उदासीनता कधीपर्यंत दिसून येईल शाळेला दिवाळीच्या सुट्ट्या लागत आहेत तरी शासन आणखीन या शाळेकडे बघायलाही तयार नाही.

# आदिवासी भागातील जुनी रुढी परंपरा : वाघ बारस

**युवक आधार**
**राजेंद्र टोपले , सुरगाणा**

असा वाघुया देव रं ऽऽ रान राख्खा तो देव रं ऽऽ

तेल परवडे वनालं तेच्या गोंदुऱ्या कापरी

तेचं बारा जन उत्तारं तो गर्जन मारं रं ऽऽ

आदिवासी डोंगराळ भागात दऱ्याखोऱ्यात कडेकपारीत खेडोपाडी वस्ती करून जीवन जगणारा आदिवासी बांधव हा निसर्गाचा नियम पाळून जीवनाची गुजराण करीत आला आहे. वाघदेव (खड्या) हा जंगलाचा रक्षणकर्ता असून त्याच्याबद्दल डेरा आदिवासी लोकगीतांतून ऊहापोह केला आहे.

डोंगराळ भाग हा शेतीवाडीत वसलेला असल्यामुळे रानोमाळी लोक पुर्वीपासून डोंगर माथ्यावर 'झाप' बांधून निसर्ग नियमानुसार विनातक्रारी गुण्यागोविंदाने जीवन जगत आले आहेत.भारताचा पशुपालनाच्या बाबतीत जगात पहिला क्रमांक लागतो. म्हणून अतिदुर्गम भागातही पूर्वापार चालत आलेल्या रूढी परंपरेनुसार आजही आदिवासी बांधवांनीही पशुपालनाला सर्वाधिक महत्त्व दिले आहे. आदिवासी बांधव हे गोरगरीब शेतमजूर असल्याने कष्टाच्या कामासाठी बैल आणि रेड्यांचा(दोबड) नांगरणी (आऊत धरणे) बैलगाडी,लाकड ओढणे या कामासाठी आदिवासी भागात पाळीव प्राण्यांचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. त्याशीवाय शेतीपूरक



व्यवसाय म्हणून गाई, म्हशी (पारडी)(पील्ल कालवड,गोरा वासरं)शेळी,बोकड(पील्ल लवारा,पाठ) ही जनावरं (जीत्राब) शेण खतासाठी आदिवासी भागातही प्रत्येक शेतकऱ्याने पाळलेली आहेत. परंतु निसर्गाबद्दल श्रद्धा तेवढीच जोपासली आहे.

पावसाळ्यातील हिरवीगार वनराई अशातच आपला संसार थाटून घनदाट रानात रहाळी वसली आहे.त्यामुळे आदिवासी बांधवांना निसर्गातील लहानात लहान घटकांचे सूक्ष्मज्ञान अवगत आहे. वन्यजीवांचा दगडी, कापरीचा निवारा देखील आढळतो. रानातील शेती पिकात वर्षभर जीवनाचे प्राण गुंतलेल्या आदिवासी बांधवांवर निसर्गाची छाप पडलेली आहे. वर्षातील बाराही महिने तीनही ऋतूत रानात गुर, ढोर चारणे, रानफुले,(मोह फुले) वेगवेगळी रानफळे, बीन खताच्या रानभाज्या,कंदमुळे(कडुकंद) औषधी आयुर्वेदिक वनस्पती, शेती कामासाठी लाकडी अवजारे,रानवेल(भारा,मोळी बांधण्यासाठी वाख ) शोधने डींख,लाख, मध इंधनासाठी वाळलेला लाकुड फाटा गोळा करणे, शीकारी साठी वाघूर देत मागवाड लावणे. इत्यादी कामांसाठी डोंगराळ भागात कडे, कपारीत रानोमाळ आदिवासी बांधवांना आजही रानवाटेच्या चोळव्याने तर कुठ काट्या,कुट्यात झुडपात आडभरू हिंडताना दिसतात ( आडभरू - अडचणीच्या ठिकाणी) भटकंती करावी लागत असल्यामुळे निसर्गाच्या सानिध्यातील मानवी पामर (गरीब) लेकरांना, पाळीव प्राण्यांना जंगलातील हिस्त्र प्राण्यांपासून कोणत्याही प्रकारची इजा होऊ नये. म्हणून गावाच्या नियमानुसार दरवर्षी दिवाळी सणाच्या आधी तीन दिवस अगोदर आश्विन महिन्यात वसुबारस सण येतो काही भागात त्याला वाघबारस म्हणतात.

आदिवासी रूढी परंपरेनुसार हा सण साजरा केला जातो. गावाच्या वेशीवर असणारी गावदेवी, डोंगराळ भागात, दरी, खोरीत, झाडा, झुडपात विसावा घेत असलेली शेंदूर फासलेली दगडी स्थानकं तसेच काही ठिकाणी वाघोबाची व नागाची दगडावर कोरलेली मूर्तीची स्थापना ह्यांची दरवर्षी दिवाळी सणाच्या आधी अगरबत्ती, शेंदूर, गावरान कोंबड्याची रक्ती त्यात(आरवत कोंबडा,कोंबडा आरवत नसेल तर टोळ्या लहाण कोंबडीला तलग असे शब्द वेगळे वेगळे आजही आदिवासी भागात वापरले जातात) काही लोक नारळ फोडून, अगरबत्ती, शेंदूर वाहून पूजा अर्चा करतात. त्याला आदिवासी भागात वाघ बारस सण असे म्हणतात.

आदिवासी बांधव मोठ्या भावनेने पूजा करून वाघ देव, नाग देव, यांच्या नावाने जंगलातील दगडी स्थानकासमोरील जागा गाईच्या पवित्र शेनाने सारवून घेत तांदळाच्या पुंजळ्या पाडतात. गावदेवीच्या साक्षीने कोंबड्याची रक्ती सांडून मंत्रविधी करून भगत म्हणजे (पूजा करून रानाची बांधणी करणारा जाणकार व्यक्ती) गावकरी एकत्र येऊन भक्तीचा कार्यक्रम पार पाडतात. इथून पुढे वन्यजीव प्राण्यांच्या किंवा पायाखाली वावरताना हिस्त्र सापा पासून मनुष्य आणि पाळीव प्राण्यांना कोणतीही इजा होणार नाही अशी मनोभावे आशा बाळगून शेतात काम करतात. अशी जुन्या रूढी परंपरेपासून चालत आलेली आदिवासी भागातील अपार श्रद्धा आहे.

अशी माहिती आदिवासी साहित्याचे अभ्यासक व संशोधक श्री. सुभाष कामडी यांनी दिली.

# सहकार महर्षी माणिकराव पालोदकर महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी साकारले पर्यावरण पूरक आकाश दिवे

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** तालुक्यातील पालोद येथील सहकार महर्षी माणिकराव पालोदकर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दिवाळीचे औचित्य साधून आकर्षक भेटकार्ड, पर्यावरण पूरक आकाश कंदील, पणत्या बनविल्या. विविध संदेश लिहिलेले भेटकार्ड वर्ग शिक्षकांना देऊन व स्वतः बनविलेले आकाश कंदील आपापल्या वर्गासमोर लावून विद्यार्थ्यांनी शाळेला सजविले.

विद्यार्थ्यांनी टाकावू कागद बांबूच्या कामट्या, रंगीत कागद, डिंक, दोरा आदी साहित्याचा वापर



करून सुंदर असे आकाश कंदील बनवले. स्वतः तयार केलेल्या पणत्या व आकाश कंदील यांचा वापर दिवाळीत घराघरांत होणार असल्यामुळे विशेष आनंद यावेळी विद्यार्थ्यांना झाला. इयत्ता पाचवी ते सातवीच्या ५० हून अधिक विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदवला. त्यांना जयश्री चापे, राजेश ठोंबरे यांचे मार्गदर्शन लाभले. तर यावर्षी फटाके न फोडता वाचलेल्या पैशातून शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व शैक्षणिक साहित्य देऊन प्राचार्य ज्ञानेश्वर काकडे, जयश्री चापे, कृष्णा पाटील, भास्कर केरले, दिलीप जाधव या शिक्षकांनी अनोखी दिवाळी साजरी केली.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, भविष्यात सुद्धा असेच उपक्रमशील राहण्याचा व वाचन वाढवण्याचा सल्ला प्राचार्य ज्ञानेश्वर काकडे यांनी विद्यार्थ्यांना दिला.

याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक प्रदीप कानडजे, कृष्णा भांडारे, सुनील तांबे, सुनील सागरे, प्रफुल्ल कळम, योगेश निंभोरे, राजाभाऊ भोसले, भास्कर केरले, गजानन सपकाळ, विक्की चांदुरकर, डॉ रमेश काळे, संजय जाधव, महादेवी ठवरे, संतुकराव मोरे, अक्षय निकम यांनी विद्यार्थ्यांनी बनवलेल्या टाकाऊ वस्तूपासून टिकाऊ असे आकाश कंदील व इतर वस्तूंच कौतुक केले.

# शिवसेना पक्षाच्या सेलू शहर संघटकपदी गजानन शेलार यांची निवड..!

**दैनिक युवक आधार**
**(प्रतिनिधी) सेलू शिवाजी पवार**

वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशिर्वादाने आणि शिवसेना पक्षाचे मुख्य नेते, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे यांच्या आदेशानुसार, सेलू शहरातील कार्यकर्ते गजानन शेलार यांची शिवसेना पक्षाच्या सेलू शहर संघटक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.ही नियुक्ती माजी आमदार हरिभाऊ काका लहाने यांच्या शिफारसीने करण्यात आली असून, पक्षाने दाखवलेल्या विश्वासाबद्दल गजानन शेलार यांनी सर्व नेत्यांचे आभार मानले आहेत.शेलार म्हणाले की, "पक्षाने दिलेल्या या जबाबदारीचा उपयोग संघटनेच्या वाढीसाठी आणि शिवसेनेच्या विचारप्रसारासाठी निष्ठेने करेन. बाळासाहेब ठाकरे यांचे विचार आणि एकनाथजी शिंदे साहेबांचे नेतृत्व हे माझ्यासाठी प्रेरणास्थान आहे."

या नियुक्तीबद्दल परिसरातील शिवसैनिक आणि नागरिकांकडून गजानन शेलार यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे.



# मिसाईल मॅन' डॉ. कलाम यांच्या जयंतीनिमित्त वैनतेय विद्यालयात ज्ञानोत्सव




**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

**निफाड :**भारताचे माजी राष्ट्रपती आणि 'जनतेचे अध्यक्ष' म्हणून ओळखले जाणारे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती निफाड येथील वैनतेय विद्यालयात उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी न्यायमूर्ती रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि. दा. व्यवहारे होते. प्रमुख उपस्थितीत वैनतेय विद्यालयाच्या प्राचार्या मनीषा गुजराथी, उपप्राचार्य सुभाष खाटेकर, पर्यवेक्षक बी. बी. गुंजाळ, पर्यवेक्षिका आर. एम. लाहोटी तसेच योगेश्वर विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक सुनील मोगल आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. कलाम आणि सरस्वती मातांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. त्यानंतर प्राचार्या मनीषा गुजराथी, श्रीमती एस. एस. कापसे व कार्तिकी बनकर यांनी आपल्या भाषणातून डॉ. कलाम यांच्या प्रेरणादायी जीवनकार्यावर प्रकाश टाकला.

यावेळी विद्यार्थ्यांनी समानार्थी शब्दांचे फलक तयार केले होते. या फलकांचे प्रदर्शन कार्यकारी विश्वस्त वि. दा. व्यवहारे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच विद्यालयाच्या ग्रंथालयातील पुस्तकांचे आकर्षक प्रदर्शन मांडण्यात आले होते. हे प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी ग्रंथपाल राजेंद्र भवर यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमादरम्यान डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या कार्यावर आधारित प्रश्नमंजुषा घेण्यात आली. यात यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती एस. एस. कापसे यांनी केले, तर आभार प्रदर्शन रशीद पठाण यांनी केले.

आयोजित कार्यक्रमात समानार्थी शब्दांचे फलक प्रदर्शित करताना कार्यकारी विश्वस्त वि. दा. व्यवहारे, प्राचार्या मनीषा गुजराथी, उपप्राचार्य सुभाष खाटेकर, पर्यवेक्षक बी. बी. गुंजाळ, पर्यवेक्षिका आर. एम. लाहोटी व योगेश्वर विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक सुनील मोगल उपस्थित.

# साहित्य क्षेत्रात,साहित्यरत्न रायगडभूषण प्रा एल बी आणि अजय शिवकर ही दोन व्यक्तिमत्त्वे

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर**

कोकणात साहित्य क्षेत्रात आज सतत विशेष कार्यरत राहून सामाजिक कार्यात देखील उजवे असलेली व्यक्तिमत्त्वे म्हणजे साहित्यरत्न रायगडभूषण प्रा एल बी पाटील आणि अजय शिवकर दोघेही कोकण मराठी साहित्य परिषदेचे ज्येष्ठ कार्यकर्ते असून प्रा.एल बी हे कोमसाप विश्वस्त आहेत.

प्रा.एल.बी.यांनी १८ नाटके,६ एकांकिका, ६ कवितासंग्रह,३ कादंब-या,३ ललित एकूण ३६ पुस्तके प्रकाशित केली आहेत.स्थानिक कलाकारांना घेऊन २३ नाटके राज्य स्पर्धेत सादर केली आहेत.

**आगरी समाजातील मांडव प्रथा**

विरोधात ४० वर्षे आणि विधवेचे सौभाग्यालंकार उतरविण्याच्या विरोधात १५ वर्षे चळवळ उभारून समाजातून उत्तम प्रतिसाद मिळविला आहे. सामाजिक प्रबोधनासाठी कविसंमेलन हा त्यांचा महत्वाचा

उपक्रम असून खोपट्याच्या सात गावांना एक कोटी चाळीस लाखांची नळपाणी योजनेतून पाणी आणून दिले आहे.या कामी

मा.आमदार विवेक पाटील आणि ग्रामस्थांनी मोठे योगदान दिले होते.१९९८ मध्ये उरणातील लेडिजबार प्रा.एल.बींच्या नेतृत्वाखाली बंद पाडला आहे. ते एक गांधी विचारांचे राजकारणी आहेत.

आज उरण शहरात दर महिन्याच्या १७







तारखेला संपन्न होणारे कविसंमेलन १० वर्षे सातत्याने चालू ठेवण्यात कोमसाप आणि ते महत्वाचे आहेत.

दुसरे व्यक्तिमत्त्व म्हणजे अजय शिवकर.कवी, लेखक, कथाकार आणि कथाकथनकार या भुमिकेत सुप्रसिद्ध साहित्यिक आहेत.त्यांच्या साहित्याचा मोठा वर्ग आहे.एक प्रामाणिक पत्रकार म्हणून त्यांची आजपर्यंत विशेष ख्याती आहे.

उरण तालुक्यातील अनेक गावांच्या ग्रामदैवते आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे लेखन करून ग्रामीण कथा लेखक म्हणून ओळख मिळविली आहे. गावपातळीवरील उपक्रमातून त्यांनी स्वतःचा ठसा उमटविला आहे.सध्या त्यांचे स्वच्छता अभियान सुरू केले आहे.

तसेच आताच त्यांनी सर्वजनशील शब्दवेल च्या राज्यस्तरीय काव्य स्पर्धेत

कवितेचा रीलस्टार तिसरा क्रमांक, पीपल चॉईस दुसरा क्रमांक, तसेच महाराष्ट्राचा महा विजेता.. प्रथम क्रमांक असे तीन पुरस्कार श्री संत नगरी शेगाव येथे मिळवून हॅट्रिक मारली आहे.

महाराष्ट्र राज्याचे माजी शिक्षण मंत्री मा. वसंतराव पुरके आणि संत साहित्याचे गाढे अभ्यासक साहित्यिक एड. धनराज बंजारी,

केंद्रीय राज्यमंत्री मा. प्रतापराव जाधव, पालकमंत्री आकाश दादा फुंडकर, माजी मंत्री व आमदार मा.संजयजी कुटे, लोकरंग प्रतिष्ठान अध्यक्ष अनिलजी गावंडे, महाराष्ट्रातील इतर नामवंत प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व. ... यांच्या हस्ते.. .त्यांना हा पुरस्कार मिळाला.

कोकण मराठी साहित्य परिषद उरणचे ते सचिव असूनकार्यक्रमाच्या आयोजनातील ते एक महत्वाचे घटक आहेत. या उरणातील दोन्ही विशेष व्यक्तिमत्व साहित्यिकांची माहितीची " गुगलने सुद्धा दखल घेतली असल्याने उरण कोमसाप ला दिवाळीआधी गोड बातमी मिळाली आहे.